
# राज्यारोहण

डॉ. कृ. पं. देशपांडे



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. : १८९१

BVBK-0401891

# राज्यारोहण

( शिवराज्याभिषेकावरील कादंबरिका )

डॉ. कृ. पं. देशपांडे

मूल्य १२ रुपये

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ९८२१ विषय आ.वा.
दिनांक १२-७-६६ क्र. ........

BVBK 0401891

BVBK-0401891

त्रिमूर्ती प्रकाशन

कल्याण

प्रकाशक :
सौ. अपर्णा वैद्य
त्रिमूर्ती प्रकाशन
टिळक चौक, कल्याण

☆

© सौ. शुभदा कृ. देशपांडे

पहिली आवृत्ती : २२ एप्रिल १९८५
शिवजयंती, वैशाख शु॥ २ शके १९०७

चित्रकार
श्री. प्रकाश कुलकर्णी
श्री. दत्ता महाबळेश्वरकर

☆

मूल्य १२ रुपये

☆

मुद्रक
बी. आर. ट्रेडिंग कॉर्पोरेशन,
पुणे – सातारा रोड, पुणे ९.

ती. स्व. भाऊ
तथा
डॉ. वि. य. कुलकर्णी
यांना
षष्टयब्दपूर्तीच्या
मंगल प्रसंगी
कृतज्ञतापूर्वक
समर्पण

# शिवरायाचे आठवावे रुप

आजपर्यंत शिवचरित्रावर विपुल साहित्यनिर्मिती झाली आहे. होत आहे; होणे आवश्यकही आहे. शिवचरित्र एवढे महान आहे की, त्याचा विविधांगांनी वेध घेण्याचे, शोध घेण्याचे काम दीर्घकालपर्यंत चालूच रहाणार आहे. भारताची लोकशाही तत्त्वांवर घडणजडण होत असताना तर शिवाजी महाराजांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श आजच्या तरुण-पिढीपुढे असणे आवश्यक आहे; कारण त्यांच्या हातीच भावी भारताचे भवितव्य आहे.

शिवजयंती
वैशाख शु. २
शके १९०७

क्रृ. प. देशपांडे

म. सं. मं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. १८९१ दिनांक १२.७.८६
क्र. ......
विषय वा.वा

— उदया आला बाल रवी

राज्याभिषेकाचा सोहळा संपला. प्रजाजन आनंदले. पाहुणे राऊळे तृप्त झाले जो समारंभ कधी पाहिला नव्हता तो पाहायला मिळाला. त्या दिवसाचं वर्णन काय करायचं? सोनियाचा दिवस. अमृतात न्हालेला परम मंगल! परम पवित्र! शुद्ध, सात्विक, स्वर्गीय आनंद आणि तृप्त मनं घेऊन साऱ्यांनी रायगड सोडला, धावपळ थांबली.

स्वतंत्र राज्याचे स्वतंत्र सिंहासन निर्माण झाले होते. राजचिन्हांनी सजले होते. नटले होते डोळयाचे पारणें फिटले होते. साऱ्यांनी याचसाठी अट्टाहास केला होता. जीजाबाईसाहेबांनीही !

आईसाहेबांच्या एका व्रताचे उद्यापन झाले होते.

व्रत... ?

हो, व्रतच ! स्वराज्य स्थापनेचे व्रत ! !

स्वराज्य स्थापना... ! किती अवघड व्रत ! सतीचंच वाण ! ! पण त्यांनी ते स्वीकारलं होतं. अंगिकारलं होतं त्यांना जेव्हा जाण आली तेव्हापासून त्यांना सुलतानी अत्याचार दिसत होते. मोगलांच्या धाडी वारंवार येत. मुलुखच्या मुलुख बेचिराख होत निरापराधांची कत्तल होई. त्यांच्या आर्त किंकाळयांनी आसमंत भरून जाई. तरुण लेकीसुनांच्या अब्रुवर दरोडा पडे. न्याय नाही. चौकशी नाही. अंदाधुंदी आणि लहरी कारभार म्हणजे सुलतानशाही ! या लहरीपायी कोणाच्या जिवावर किंवा कोणाच्या अब्रूवर कोणता प्रसंग येईल हे सांगता येत नव्हते. मोठमोठया सरदारांनाही क्षणात ठार मारले जाई. केवळ लहर फिरली म्हणून ! मग सामान्यांची काय कथा. हे सारे पाहून आईसाहेबांना दुःख होई. संताप येई. पण काय करणार .... ? एक दिवशी तर एका मोगल सरदाराने जिजाबाईंच्या जावेलाच पळवून नेले. संतापाने त्या लालबुंद झाल्या. पण तूर्त काही करता येत नव्हते. मन पेटून उठत होते. आणि त्याचवेळी त्यांनी मनोमन ठरवले. हे जोखड झुगारून द्यायचे. पारतंत्र्याची बेडी तोडायची. हिंदवी स्वराज्य स्थापन करायचे. स्वातंत्र्याचे व्रत घ्यायचे ! !

जिजाबाईसाहेब धर्मपरायण होत्या. रामायण, महाभारताच्या उदात्त संस्काराचे परिणाम त्यांच्या मनात खोलवर रुजले होते. भोवतालची परिस्थिती पाहून त्यांच्या मनात पुन्हा पुन्हा यायचे, रामाने रावणाला मारून रामराज्य निर्माण केले ; भीमार्जुनांनी द्रौपदीच्या अब्रुबर उठणा-या कौरवांना नाहीसे केले ; माझ्यापोटी असा राम नाही का जन्माला येणार ? आईची आज्ञा पाळणारा भीम पुन्हा नाही का अवतरणार ? लेकी सुनांची अब्रू घेणाऱ्या या दुष्टांचा नायनाट

करणारा अर्जुन पुन्हा नाही का होणार ? मी वीरमाता नाही का होणार ? ...

भोसल्यांचे कुलदैवत भवानी, भवानी मातेला त्या वारंवार हेच विनवित होत्या. शंकराजवळ त्या हेच प्राथित होत्या आणि साऱ्या देवतांच्या जवळही त्या हेच मागणे मागत होत्या. पुन्हा पुन्हा हेच आळवीत होत्या.

... आणि आणि मायभवानीने, शिवशंकराने आणि साऱ्या साऱ्या देवतांनी ही हाक ऐकली. जिजाबाईंच्या हाकेला साद दिली.

जिजाबाईच्या मनीचा अंधार विरून गेला. शुक्लनाम संवत्सरात फाल्गुन वद्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर शिवरायांचा जन्म झाला. आकाशात बालरवी जन्माला आला, बाराव्या दिवशी बाळाचे बारसे झाले. नाव ठेवले ... शिवाजी !

दिसामासांनी शिवबा वाढत होता. सारेच त्याचे कौतुक करीत असत. शिवनेरीच्या अंगणात छोटे सवंगडी जमा झाले. खेळ सुरू झाले. कसले ? लढाईचे, किल्ले जिंकण्याचे. राजा होण्याचे शिवबा आपल्या सवंगड्यांच्याबरोबर हे खेळ खेळण्यात गढून जाई. जणू पुढच्या स्वराज्य स्थापनेची तयारीच !

शिवबा सहा वर्षांचा झाला. शहाजीराजांनी त्याला पुण्याला पाठवायचे ठरवले. पुणे त्यांची जहागिरी होती. त्यांनी काही दिवसापूर्वी स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न केला होता. पण अयशस्वी ! अदिलशहाने रायाराव नावाच्या मराठी सरदाराला सांगून हे बंड, हा प्रयत्न हाणून पाडला पुण्याची होळी झाली. गाढवाचा नांगर पुण्यावरून फिरला. या सरदाराने पुण्याच्या पुण्यभूमीत एक लोखंडी पहार ठोकून त्याला एक तुटकी वहाण अन् फुटकी कवडी अडकवून ठेवली. स्वराज्याचा प्रयत्न करणाऱ्यांना केवढी जबरदस्त शिक्षा ! केवढी दहशत ! ! संपूर्ण पुणे ओस पडले होते.

एक दिवशी शिवबा आपल्या आईसाहेबांसह पुण्यात आला. बरोबर एक वृद्ध पण करारी मुद्रेचे गृहस्थ होते. दादोजी कोंडदेव ! पुण्याने उत्सुकतेने त्यांच्याकडे पाहिले. आपलीच माणसे पाहून त्यांना

हायसे वाटले. बऱ्याच दिवसांनी पुण्याच्या मुखावर स्मिताची रेशा उमटली आणि बाल शिवबांनीही त्याला साद दिली.

पुण्यात कसबा गणपती अडचणीत पडला होता. त्याला मंदिर मिळाले. लालमहाल तयार झाला. पुण्याच्या भूमीवरून पूर्वी गाढवाचा नांगर फिरला होता दादोजींनी शिवबाला हाताशी धरून सोन्याचा नांगर पुण्यातून फिरवला. गाव वसवायला लोकांना उत्तेजन दिले. शिवारातून पिके डोलू लागली पुणे शहर या नवीन कारभारामुळे हसू लागले. आनंदी झाले. तृप्त झाले.

शिवबाही पंतांच्या बरोबर मावळातून हिंडू लागला. चलाख हुषार मावळी पोरे त्याच्याकडे आकर्षिली जात होती. त्यांना त्याने मायेने जवळ बोलावले त्यांनाही बरे वाटले. लालमहाल या बाल गोपाळांनी घुमू लागला. सारेच लढाईचे शिक्षण घेत होते. हातांनी हे शिक्षण घेत असतानाच शिवबा त्यांच्या मनाला आकार देत होता. स्वातंत्र्याचे बीजारोपण करीत होता लहान वयात ही एवढी हुषारी ? एवढा पोच .... ?

त्याचे कारणही तसेच होते. शिवबा अती चवकस होता. आई साहेबांच्या बरोबर हिंडायला गेला की तो अनेक शंका त्यांना विचारीत असे. 'हे देऊळ का उध्वस्त झालं ? ही मशीद अशी देवळा सारखी का ? हे मोगल कोण ?' अशा एक ना दोन, अनेक शंका तो विचारीत असे. आणि उत्तरं मिळत ती आईसाहेबांच्या मुखातून! अग्नीसारखी तप्त! उसळत्या तेलासारखी!! ज्वालामुखीच्या लाव्हारसासारखी!! त्या बोलण्याचा परिणाम त्या संस्कारक्षम मनावर होई. हे सुलतान आपले कोणी नाहीत. त्यांच्यामुळे देशाला अवकळा आली आहे. देशा करता, धर्माकरता, मायबहिणींच्या अब्रूकरता स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हे शिववाला समजले. पटले. त्याचे बालमन संतापून उठत होते. हात शिवशिवत होते. बालमुठी वळत होत्या आणि बंगळूरला आणि विजापूरला जाऊन आल्यानंतरतर या प्रेरणा जास्तच उचंबळून येत होत्या.

आईसाहेबांनी रामायण, महाभारत, पुराणातील गोष्टीसांगून

त्याचे मन घडवले होते. पारतंत्र्याची चीड, संताप त्याच्या रोमारोमात भिनवला होता. राम, कृष्ण, अर्जुन, अभिमन्यू यांचे शौर्य त्याच्या डोळ्यासमोर तरळत होते. या दैत्यांचा नाश केला पाहिजे हे मनोमनी ठसले होते.

आणि हे सारे शिवबा आपल्या सवंगड्यांना सांगत होता. त्यांना आकार देत होता. भारतातल्या एवढ्या मोठ्या पातशाहीला सुलतानशाहीला टक्कर देऊन स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न ही पंधरा सोळा वर्षांची पोरे करणार होती. सह्याद्रिच्या मदतीने! त्याच्या कडेखांद्यावर लपून! सह्याद्रिच्या दऱ्याखोऱ्यात स्वातंत्र्याची स्वप्न तरळत होती. किती अवघड काम ? किती विलक्षण? पण साऱ्यांची तयारी झाली होती. मने तयार झाली होती. शस्त्र तयार झाली होती. दादोजींची साथ होती. बारामावळे त्यांनी या कार्यासाठी तयार केली होती. रोहिडेश्वराच्या साक्षीने सगळे वचनबद्ध झाले होते. स्वातंत्र्य मिळवायचेच ! प्राणाचे मोल द्यायची वेळ आली तरी! रंगमंचाची पूर्ण व्यवस्था झाली होती. पडदा वर गेला की एक दैदिप्यमान नाटक सुरू व्हायचे होते. सगळे तयार होते टिपरी पडायचाच अवकाश होता. सारे त्याच साठी थांबले होते.

आणि शिवबाच्या आणि त्याच्या सवंगड्यांच्या भिरभिरत्या आणि तीक्ष्ण नजरेत एक गड भरला. बादशहाने दुर्लक्षिलेला. गडावर राबता नव्हता. गड····? गड तोरणा! पटकन् त्यांनी गड ताब्यात घेतला. साडेतीनशे वर्षानंतर महाराष्ट्राचा हाताच्या पंजाएवढा भाग स्वतंत्र झाला किती आनंद झाला साऱ्यांना. शब्दांत कसा सांगू ? मराठ्यांचे चवकीपाहरे बसले ' राजांनी....हो राजांनीच एवढ्याशा राज्याचे एवढेसे महाराज! म्हणजे सोळा वर्षाचे! राजांनी गडाची डागडुजी काढली अन् काय सांगावं, भवानी प्रसन्न झाली. खणता खणता प्रचंड धन सापडलं. आता याचा उपयोग ? स्वराज्यासाठी! तोरण्यावरून समोरच एक डोंगर दिसत होता मुरुंबदेवाचा डोंगर! तोही एक अर्धवट गडच होता. महाराजांनी त्याचे बांधकाम सुरू केले. नव्या स्वराज्याची नवी राजधानी साकारू लागली. किल्ले राजगड !

महाराजांनी आता बादशहाने दुर्लक्षिलेले किल्ले घ्यायला सुरुवात केली. स्वराज्याचा बालरवी नुकताच कोठे क्षितीजावर येत होता, तोच स्वराज्यावर एक आघात झाला. आजपर्यंत माया ममतेने वागवणारे दादोजी कोंडदेव स्वराज्यावरचा आपला पहारा संपवून देवाघरी गेले सारेच दु:खात बुडून गेले.

पंत देवाघरी गेल्याने 'कोंडाणा' पोरका झाला. कारण तो गड त्यांच्या सुभ्यात होता. बादशहाने गडाचा कबजा घेण्यासाठी मियारहीम महंमद यास पाठवले. गड तर स्वराज्यांत हवा, महाराजांनी ही गोष्ट बापूजी मुद्‌गल देशपांड्यांना सांगितली.

गड बळकट. झुंजून उपयोग नाही. बापूजींनी काय युक्ती केली कोणास ठावे पण गड स्वराज्यात आला. महाराज आनंदले. संतुष्ट झाले. गड कोंढाणा मिळाला.

आणि बादशहाला बातमी समजली बापरे...! गढ कोंढाणा गेला.... आजपर्यंत त्याच्या कानावर बातम्या जात होत्या, पण त्याने दुर्लक्ष केले. ही शेंबडी पोरे काय करणार ? असे त्याना वाटत होते. पण आज... कोंढाणा गेला. बादशहा संतापला. लाल झाला आता गप्प बसलो तर काही दिवसांनी सारंच जाईल. आता या शिवाजीचा बंदोबस्त केलाच पाहिजे.

बादशहाच्या पदरी असलेल्या मुस्तफाखानाने सल्ला दिला शहाजीला कैद करावे आणि शिवाजीवर मोठी फौज पाठवावी. सल्ला मानवला. पण शहाजीला कैद म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. ती जबाबदारी मुस्तफाखानाने घेतली बरोबर मदतीला होते राजांच्यावर जळणारे बाजी घोरपडे ! आमचेच लोक आमच्या लोकांना गिरफ्दार करण्यासाठी परक्यांना मदत करतात. काय शौर्य ! दोघांनी राजांना बेसावध स्थितीत कैद केले. केवढा पराक्रम केला. ज्याने आपल्या सामर्थ्यावर अदिलशाही जिवंत ठेवली, त्या मोठ्या आधारालाच कैद! हीच ती सुलतानशाही! !

लगेच शिवाजीवर फत्तेखानाला सात हजार फौजेनिशी पाठवले आणि ...आलीच बातमी ! वायुवेगानं आली. शहाजीराजांना बादशहाने

कैद केली आणि अफजलखान त्यांना विजापूरला नेत आहे. शिवाय स्वराज्यावरही फत्तेखान चालून येत आहे.

काय भयंकर पेच? तळहाताएवढ्या स्वराज्यावर केवढे हे संकट? पहिलेच संकट पण किती जबरदस्त! बादशहाने सरळ सवाल टाकला बोल तुला काय हवे? स्वराज्य की वडील? मुत्सुद्दी मंडळींची डोकी सुन्न होऊन गेली. महाराज विचार करू लागले, काय करायचं?

विचार करून करून त्यांनी ठरवले, आधी फत्तेखानावर फत्ते करायची. पुरंदरावरून लढायचे. गड स्वराज्यात नव्हता. महादजीपंत सरनाईक गडाचा कारभार पहात होते. महाराजांनी त्यांना विचारले 'गडात घेता का?' त्यांनी 'होय' म्हटले आणि काय सांगावे या छोट्या पोरांनी हजार बाराशे मावळ्यांनी पुरंदरच्या पायथ्याशी फत्तेखानाचा सडकून पराभव केला. खासा खान पळून गेला. मराठ्यांची मने विजयश्रीने धुंद झाली. स्वराज्याचा पहिला विजय!

तरी संकट संपले नव्हते त्याची तीव्रतातर आता अधिकच वाढली का...? अहो आता या खानाने खाली मान घालून पराभव झाल्याचे सांगितल्यावर, बादशहा शहाजीला जिवंत सोडील का? काळजी वाढली.राजांचे भवानीचे स्मरण चालू होते अन् त्यातच त्यांना युक्ती सुचली...युक्ती सुचली.

महाराजांनी दिल्लीच्या बादशहाला पत्र लिहिले, "मी आणि माझे तीर्थरूप बादशहांची सेवा करू इच्छितो पण अदिलशहाने तीर्थरूपास कैद केले आहे. ते सुटतील तर आम्ही आपल्या सेवेस रुजू होऊ" काय अचाट बुद्धिसामर्थ्य? शहाजीराजांना सोडविण्यासाठी अदिलशाहीला दिल्लीचा शह! महाराजांनी मुत्सुद्दिगिरीची कमाल केली. या वेळी राजाचं वय होतं केवळ अठरा वर्षांचं!!

बादशहाच्या कानावर ही बातमी जाताच तो चाटच झाला. घाबरला आणि त्यांनी शहाजी राजांना मानानं सोडून दिलं. राजगडावर बातमी आले. सारे आनंदले जिजाबाईंना तर किती आनंद झाला म्हणून सांगू? चुडे दान मिळालं शिवबाच्या बुद्धीने सौभाग्य मिळाले आपल्या आवडत्या पुत्राचे किती कौतुक केले असेल त्यांनी? सारे आनंदी असताना चडपडत होते बादशहा ...बाजी घोरपडे आणि अफजलखान...!!

महाराजांनी शहाजीराजांना सोडवले पण त्या ऐवजी त्यांना त्यांचा आवडता कोंढाणा मात्र द्यावा लागला. कोंढाण्यावर परत हिरवं निशाण फडफडलं

स्वराज्यावरचे मोठे संकट टळले. त्यामुळे आत्मविश्वासही वाढला होता महाराजांना आता वेळ नव्हता. जेवढं जमेल तेवढे स्वराज्यात आणायचा खटाटोप चालला होता.

जावळीचा चंद्रराव मोरे वास्तविक महाराजांच्या मदतीने राज्यावर बसला. महाराजांना वाटत होते आपला माणूस, मदतीला येईल, पण त्याची निष्ठा मोगलांचे पायी. समजाऊन सांगून ऐकेना मग एके दिवशी छापा घातला. चंद्ररावचा पराभव झाला. जावळी स्वराज्यात आली. थोड्याच दिवसात रायरीगड नंतरचा रायगड स्वराज्यात आला. महाराजांना हा गड फार आवडला, चढावच तीन कोसांचा! उंच!! बुलंद गड! रायगडाबरोबरच खोऱ्यातले चंद्रगड, मकरंद गड, सोनगड इत्यादि अनेक गड स्वराज्यात आले.

जावळीच्या खोऱ्यातच महाराजांच्या भिरभिरत्या नजरेला एक उंच डोंगर दिसला. भोवतालून उंच उंच डोंगरांच्या गराड्यात असणारा भोरप्या डोंगर! महाराजांनी मोरोपंताना सांगितले "पंत हा खासा डोंगर गड बांधावा."

मोरोपंतांनी गडबांधला. गड प्रतापगड!!

याच वेळी महाराजांनी मोगली मुलखावर छापे घातले जुन्नर अहमदनगर लुटले. औरंगजेब खूप संतापला पण शिवाजीकडे पहायला त्याला आता फुरसत नव्हती. तो गडबडीत होता. दिल्लीला जायच्या. बादशहा होण्यासाठी! शहाजहान आजारी होता ना!

इकडे महाराजांच्या दोस्तांनी अदिलशाही झोडपून काढण्यास सुरुवात केली. महाराजही सांगाती होतेच. कऱ्हे पठार स्वराज्यात आले. कोंढाणा पुन्हा मिळविला. तुंग, तिकोना लोहगड, प्रबळगड हे गड, कल्याणभिवंडी ही ठाणी महाराजांनी घेतली. निम्मी कोकणपट्टी घेतली.

दररोज विजापूरला बातम्या जात होत्या. "आज हा गड गेला उद्या ते ठाणे गेले, परवा ते बंदर शिवाजीने घेतले" बादशहा संतापत

होता नुसताच. आता मात्र त्याने ठरवले " काय वाटेल ते झाले तरी शिवाजीचा काटा काढायचाच ". याला साथ दिली बादशहाच्या आईने. बड्या बेगमने ती शिवाजीवर खार खाऊन होती.

बादशहाने दरबार भरवला सारे अमीर, उमराव, सरदार दरबारात उपस्थित होते. दरबाराच्या पुढे ताट होते. विड्याचे! पैजेच्या विड्याचे ! पैज...? कोणती? शिवाजीवर जाऊन जय मिळविण्याची !



दरबार स्तब्ध होता. शिवाजीवरची मोहीम! फत्तेखानाचा प्रसंग अजून लोक विसरले नव्हते. शिवाजीवर मोहीम म्हणजे सोपी नव्हती. अजूनही सारे शांत होते. या भयाण शांततेमुळे बडी बेगम चिडली. ओरडून तिने विचारले.

" बताओ, कौन शिवाजीपर जाएगा, और उसे खत्म करेगा ? अजून शांतताच होती. पुन्हा तिने विचारलें.

" क्या, हमारे यहाँ अेकभी सरदार ऐसा नहीं जो शिवाजीको कत्ल कर देगा...? "

नाही कसा ? एका बाजूला हालचाल झाली. एक धिप्पाड खान मोठ्या ऐटीत पुढे आला. कोण हा ? खान अफजलखान! त्याने सांगितले

" खाविंद । आप फिक्र मत किजिए । मैं शिवाजीको आपके सामने पेश करुंगा । "

याला म्हणतात जिद्द ! वडी साहेबीण खुश झाली सुलतान खुश झाल्यावर मग काय पाहिजे ? त्याचा मोठा सत्कार झाला. बादशहाने त्याला रत्नजडीत कट्यार दिली. पोशाख दिला आणि खान निघाला. वीस हजार फौज घेऊन. खानाने हुकूम सोडला " तुळजापूर .. तुळजापूर... "

अफजलखान म्हणजे भला मोठा माणूस. राक्षसासारखा ! किल्ल्याच्या बुरजासारखा ! शूर पराक्रमी आणि तितकाच क्रूर आणि कपटी. शहाजी राजांना विजापूरला नेण्यात हाच आघाडीवर होता. याच्याचमुळे महाराजांचा सख्खा थोरला भाऊ ठार झाला होता आणि आता हे धूड शिवाजी राजांना गिळायला स्वराज्यावर येत होते. स्वराज्य पुन्हा संकटाच्या छायेत वावरू लागले.

बारामावळातल्या देशमुखांना खानाला मिळण्याची पत्रे गेली, पण त्यातल्या वयस्कर कान्होजी जेध्यांनी साऱ्यांची मने वळविली सारे महाराजांच्या बाजूने उभे ठाकले खंडोजी खोपडा तेवढा खानाला मिळाला.

पावसाळ्यातली नदी जशी बेफाम वेगाने वाहत येते. उन्मत्त बनून पुढे जाते तसा खान गर्जत गर्जत आला. तुळजापूरची देवी फुटली. पंढरपूरच्या विठोबावर धाड आली खानाला वाटत होते की, देवदेवतांच्या वरती घाला घातला की शिवाजी उघड्या मैदानात येईल. मग त्याचा खिमा करायला कितीसा उशीर ?

महाराजही काही कच्च्या गुरुचे चेले नव्हते. त्यांना हे माहीत होते. यावेळी महाराज राजगडावर होते. खानाला जावळीच्या अरण्यात आणायचा अन् मग काटा काढायचा, असे त्यांनी ठरवले. कारण तेथे येणे खानाच्या हाती होते; पण जिवंत जाणे महाराजांच्या हाती. अत्यंत अवघड मुलुख. महाराजांनी आईसाहेबांचा, सईबाई राणीसाहेबांचा जड अंतःकरणाने निरोप घेतला. महाराज प्रतापगडी दाखल झाले. आणि

काही दिवसातच खान वाईला आला. त्याच्या प्रचंड लष्कराचा तळ कृष्णेच्या काठी पडला.

आता त्याला शिवाजीशिवाय दुसरे काहीच सुचत नव्हते. खानाने आपला वकील कृष्णाजीपंत भास्कर यांना महाराजांकडे पाठवले. पढवून पाठवले. वकील महाराजांच्याकडे आले. त्यांचा योग्य तो सन्मान झाला, आणि वकीलाने सांगितले "आपण वाईला येऊन खानाला भेटावे. खान आपल्याला क्षमा करतील" खानाचे पत्रही महाराजांना मिळाले असेच दमदाटीचे होते दुसऱ्या दिवशी कृष्णाजी भास्करांच्या बरोबर महाराजांचा वकील खानाकडे निघाला. पंताजी गोपीनाथ, महाधूर्त. राजकारणी, गोडबोलणारे त्यांनी खानाची गाठ घेतली खानाला नम्रतेने सांगितले आपला आणि शहाजीराजांचा भाईचारा महाराज आपल्याला काका मानतात. महाराज लहान आपल्याला फार भितात. आपणच मोठेपणाने जावळीत यावे. महाराज आपल्याला भेटतील. त्यांना क्षमा करावी अन् बोटाला धरून बादशहांच्याकडे घेऊन जावे. महाराज फार भितात म्हणून आपल्याला तसदी." पंताजी अत्यंत मृदु मुलायम वाणीने बोलले आणि खान फसला. सैन्यासह जावळीला यायला तयार झाला. वाघाच्या गुहेत ! सर्वस्वाचा नैवेद्य द्यायला ! !

आणि पसरणीच्या घाटाने रडत, कण्हत, कुथत खान कसातरी त्या भयंकर अरण्यात दाखल झाला. केवढा आटापिटा करावा लागला पण अहंकाराची जादू काही और असते. विनाशकाल आला की विपरीत बुद्धी होते

वकीलांची जा ये चालू होती. भेटीचा तपशील ठरला. दिवस ठरला. १० नोव्हेंबर १६५९ गुरुवार, दुपारी दोन वाजता! पंतांजींनी खानाला वारंवार सांगितले होते. 'महाराज भितात', खान त्यामुळे स्वत वरच खुश होत होता. फुगत होता. बेडकीसारखा !

खानाबरोबर हिऱ्यामाणकांचे व्यापारी आले होते. साऱ्यांना महाराजांनी गडावर बोलावले एवढा मोठा पाहुणा यायचा त्यांचा सत्कार तसाच नको का व्हायला ? विजापूरची बरीच धन दौलत भेटी आधीच गडावर दाखल झाली.

महाराजांनी सारी व्यवस्था केली. साऱ्या सैन्याने आधल्या दिवशीच्या अंधारातच अफजलखानाच्या छावणीला घेरले. खानाला कल्पनाही नव्हती स्वतः कसे जायचे, कोणी बरोबर यायचे सारे ठरले. योजना चोख होती. आता सारा हवाला देवी भवानीवर !

भेटीचा दिवस उगवला. प्रतापगडाच्या डोंगराच्या एका भागावर शामियाना डोलत होता. सर्व थाट शाही होता पंताजी आधीच खानाकडे आले. ठरलेल्यापेक्षा अधिक लोक खानाने घेऊन येऊ नये म्हणून. खानाची पालखी आली. शामियाना पाहून तो सर्दच झाला खान बसला जवळच सय्यदबंडा हाती तलवार घेऊन उपस्थित होता

महाराजांनी चिलखत घातले. जिरेटोप घातला. वाघनखे घातली. कट्यार लपवली. देवी भवानीला आणि वृद्धांना नमस्कार केला. महाराज निघाले. देवद्वेष्टयाच्या भेटीला निघाले. कपटयाला भेटायला निघाले. गडाचा गळा दाटून आला. काय सांगत असेल प्रतापगड....? " शिवबा जा विजयी हो. भवानी तुझ्या पाठीशी आहे."

महाराज आले. त्यांनी सय्यदबंडाला पाहिले. पंतांना सांगितले " पंत एवढा हशम दूर करायला सांगा."– महाराज आत गेले दोघांचे वकील होतेच. त्यांनी शाही पद्धतीने ओळखी करून दिल्या. खान उभा राहिला. पर्वतच समोर आल्यासारखे वाटले. त्याने हात पसरून महाराजांना भेटायला बोलावले. मृत्यूचा जबडाच तो खान म्हणाला,

" आईये राजा साब,"

महाराज त्या दुष्टाच्या मगरमिठीत शिरले. आणि खानाने घात केला. लपवून ठेवलेली कट्यार महाराजांच्या कुशीत खुपसली पण महराजांनी चिलखत घातल्याने नुसतीच खरखरली, पापणीही लवली नाही तोच....तोच महाराजांनी आपली कट्यार खानाच्या पोटात खुपसली. खान ओरडलाच ' दगा ऽ दगा ऽ ये सिवाजीने मुझे मार दिया '. खानाचा वकील महाराजांवर चालून आला, पण सांगूनही न ऐकल्याने महाराजांनी त्याला ठार केले. जीवा महालाने सय्यदबंडाला मारले. खान तशाही स्थितीत रक्त गाळीत गाळीत पळाला. भोयांनी पालखी आणली खान पालखीत बसला. पण हाय... संभाजी कावजीने

भोयांचे पायच कापले. पालखी आदळली. त्याने खानाचे मुंडकेच तोडले. खान ठार झाला. तुळजा भवानी प्रसन्न झाली. पंढरीचा विठोबा आनंदला. आईसाहेब संतोषल्या ! महाराच तातडीने गडावर गेले. सगळीकडे आनंदाची बातमी पसरली खान मेला ... खान मेला.

आणि गडावरच्या तोफांनी किंकाळचा फोडल्या. रणदेवतेला आव्हान केले खानाच्या सैन्याला वाटले भेट झाली. त्यासाठी तोफांची सलामी असेल पण ती हाक होती शूर चित्त्यांना, वाघांना, मराठ्यांना! त्यांनी रणयज्ञात उड्या घेतल्या. बेसावध खानाची फौज अक्षरशः छाटून टाकली. घाल घाव की कर तुकडे. खानाच्या सैन्याला समजायच्या आतच ते मरत होते. रणचंडी प्रसन्न झाली. शरण आले तेवढे वाचले खानाचे दिव्य चिरंजीव फाजलखान पळत सुटले. सोबतीला होते प्रतापराव मोरे, मुसेखान आणि आणखी काही लोक. जावळीच्या अरण्यात साऱ्या सैन्याची लंगडेतोड झाली. सुमारे वीस हजार फौजेनिशी खान पार बुडाला. साफ झाला. एक मोठा विजय महाराजांना मिळाला.

आईसाहेबांच्या मनासारखे झाले. संभाजीच्या वधाचा सूड घेतला.

स्वराज्याच्या नुकत्याच जन्मलेल्या बाल रवीवरचे आणखी एक महान संकट नाहीसे झाले आकाशात तो पुन्हा तेजाने तळपू लागला.

❊ ❊ ❊

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र ४८८१. दिनांक १२.१.८
विषय ऐ. गो. क्र.......

## — उदंड जाहले राज्य

महाराजांनी अफजलखानास ठार मारले. आदिलशाहीला एक जबरदस्त तडाखा दिला. शाश्वताचा देठ तोडला. अशक्य ते शक्य केले या विक्रमानंतर महाराजांनी क्षणाचीही विश्रांती घेतली नाही. सगळीकडे बातमी पसरायच्या आत, अन् या आघाताने बादशहाचे हतबुद्ध झालेले डोके ताळ्यावर यायच्या आत, जे सापडेल ते पदरात पाडायचे असा महाराजांचा मनसुबा होता. योजना तयार होती.

खानाच्या वधाच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी दोरोजीला कोकणात आदिलशाही मुलखात सोडला. नेताजीला विजापूरपर्यंत दौड मारून लूट करायला सांगितली ; आणि स्वत: सातारा, कोल्हापूरपर्यंन्तचा भाग घ्यायचा ठरवला आणि काय आश्चर्य एका मागून एक विजय मिळत गेले. खानाच्या वधाची बातमी पोहोचायच्या आत धाडी पडत होत्या. अंमलदार, सैन्य बेसावध असतानाच ठाणे, गड गेल्याचे त्यांना उघड्या डोळ्यांनी पहावे लागत होते.

दोरोजीच्या पुढे कोकणातली ठाणी थरथरा कापत होती. नेताजीच्या पराक्रमावर लक्ष्मी फिदा होती आपण होऊन स्वराज्यासाठी पुढे येत होती आणि महाराजांनाही सतत विजय मिळत होते. अवघ्या अठरा दिवसांत महाराजांनी वाईपासून कोल्हापूरपर्यंन्तचा पट्टा आणि पन्हाळगड स्वराज्यात दाखल केला.

बादशहाला बातम्या जातच होत्या पण; खानाच्या पराभवाने तो इतका हदरला होता की, संतापण्या पलिकडे, दातओठ खाण्याशिवाय अन् रागाने लालबुंद होऊन मुठी वळण्याशिवाय तो काहीच करू शकत नव्हता. आणि अशा स्थितीत बातमी आली ' शिवाजीने पन्हाळा घेतला. बादशहा पुन्हा हदरला ! " ये अल्ला, ये क्या हुआ ? " या प्रकाराने आणखीही एक सरदार संतापला. खान रुस्तुमेजमान ! याला संतापायला काय झालं ? काय झालं ...? अहो पन्हाळा किल्ला त्याच्या जहागिरीतला ! तोच गेला, मग संताप येईल नाहीतर काय होईल ? बापाच्या सूडाने जळणाऱ्या फाजलखानाला एक मित्र मिळाला. दोघेही बादशहाकडे गेले आणि म्हणाले,

" खाविंद, एक अर्जी है। हम दोनोंको सीवाजीपर जाने दो ! हम उसे कत्ल कर देंगे। "

बादशहालातरी आणखी काय हवे होते ? ताबडतोब खान दहा हजार फौजेनिशी निघाले. मनातून घाबरलेलेच होते. कारण गाठ होती शिवाजीशी ! कोल्हापुरापाशी हे आले आणि त्यांना कळले शिवाजी आणि नेताजी पाच हजार फौजेनिशी येताहेत. सारेच घाबरले. एकदम दोन भुतांशी सामना ये अल्ला ! लढाई सुरू झाली अन काही वेळातच

फाजलखान पळत सुटला आणि ते पाहून रुस्तुमही !! पुन्हा एकदा अदिलशाही फौजेने मार खाल्ला, सपाटून मार !! अदिलशाहीचे ग्रहच फिरले.

ही बातमी बादशहाला कळल्यावर बादशहा खूपच भडकला. पूर्वीपेक्षा जास्त ! आता शिवाजीवर कोणाला पाठवायचे....? आणि त्याला नाव आठवले. सलावतखान सिद्दीजोहर !! एक अनुभवी, शूर आणि कर्तबगार सेनापती. त्याने प्रचंड फौजेनिशी त्याला शिवाजीवर रवाना केले आणि दिल्लीला औरंगजेबालाही पत्र लिहिले की " शिवाजीचा नायनाट करण्यासाठी आम्ही शिवाजीवर फौज पाठवली आहेच तुम्हीपण पाठवा " स्वराज्यावर हे दुहेरी संकट येत होते. आणि महाराज होते. मिरजेच्या गडाला वेढा घालून !

महाराजांना बातमी कळली ते पन्हाळ्याला आले. पन्हाळा स्वराज्याच्या टोकाला असल्याने व भक्कम असल्याने हाच गड त्यांनी निवडला बाकीचे गड स्वराज्यात मध्यभागी होते. आपल्या पाठोपाठ शत्रू आला की तो स्वराज्याची धुळधाण करील. ती व्हायला नको. जोहरही आलाच. त्याच्या बरोबर फाजलखान होता. सूर्यराव सुर्वे जसवंतराव पालवणीकर हे ही त्यांना मिळाले. जोहरने त्यांना विशाळगडाला वेढा घालायला रवाना केले. आणि फाजलच्या मदतीने त्याने पन्हाळ्याला वेढा घातला चौक्या पहारे व्यवस्थित होते. वेढा कडक होता. एक मुंगीही इकडची तिकडे जाऊ शकत नव्हती. गड घेण्याचाही प्रयत्न चालला होता. गोऱ्यांच्या तोफाही धडाडत होत्या. पन्हाळा अजून अभाळात डोके खुपसून सारी मजा पाहत होता. (सन १६६०)

पंधरा दिवस झाले महिना....दोन-तीन महिने झाले. गड हाती येण्याची चिन्हे दिसेनात. वेढामात्र कडेकोट होता. पावसाळा आला. मुसळधार पावसातही वेढा तितक्याच नेटाने चालू होता.

महाराजांना गडात अडकून साडेतीन महिने होत आले होते. तिकडे औरंगजेबाने शाईस्तेखानाबरोबरही साठ हजार फौज पाठविली होती. तो पुण्यात तळ देऊन बसला होता. महाराजांनी विचार केला आता सुटलेच पाहिजे. या पावसाचा जर उपयोग करून घेतला नाही तर पुढे निसटणे अशक्य.

योजना तयार झाली महाराजांचे सारेच काम योजनाबद्ध, जिवावरचे असे. थोडे चुकले की प्राणावरच बेतायचे हेरांनी अचुक माहिती आणली. वेढ्याच्या अवघड जाग्यावरची फट शोधून काढली. महाराजांनी जोहरकडे वकील पाठवून "आम्ही उद्या रात्री जातिनिशी भेटीला येतो" असा निरोप पाठविला. त्याचा योग्य तो परिणाम होऊन छावणी गाफील झाली अन् त्याच रात्री सहाशे शूर मावळ्यांसह, बाजीप्रभू देशपांड्यांसह महाराज पालखीतून वेढ्यातून निसटले गेले वेढा पार करून गेले. अन सिद्दीच्या हेराने पाहिले. घात झाला. आता.... आता काय करायचे ? विशाळगडी कसे पोहचायचे ? रस्ता अडवळणी· पावसाने गुढगा गुढगा चिखल झालेला. विशाळगडाला सूर्यरावचे मोर्चे लागलेले. साराच भवानीवर भार. तीच यातून मार्ग काढणार.

जवळच्या मोकळ्या पालखीत शिवाजीचा पोशाख करून एकजण बसला. भोवताली पंधरा वीस–जण थांबले आणि बाकीचे आड मार्गाने पळत सुटले.

बातमी जोहरला कळताच मोठ्या फौजेसह मसूदखान पाठलागावर आला पालखी सापडली छावणीत गेला, पण तो शिवाजी नव्हताच. फसला. चिडला. खूप चिडला अन पुन्हा पाठलाग....

महाराजांनी गजापूरची खिंड कशीतरी गाठली. आणखी चार कोस जायचे होते आणि शत्रू आला बाजीप्रभूंनी महाराजांना कसे तरी पुढे पाठविले आणि सांगितले 'विशाळगडी पोचल्यावर पाच तोफांचे आवाज. काढा. तोपर्यन्त शत्रू तुमच्या मागे येऊ देत नाही." केवळ तीनशे, मावळ्यांसह बाजी शर्थीने झुंजले. जखमांनी फुलून गेले तरी लढले. महाराजही त्वरेने सूर्यरावाचे मोर्चे भेदून विशाळगडी सुखरूप पोहचले. बाजी खूप जखमी झाले होते. प्राण कंठाशी आले होते एवढ्यात तोफेचे आवाज ऐकले. 'राजा पोहचला आता सुखानं मरतो' म्हणून खिंडीत देह ठेवला. खिंड पावन झाली. नाव पडले पावनखिंड !

साडेतीन महिन्यानंतर महाराज सुटले. सिद्दीने तरीही चडफडत पन्हाळ्याचा वेढा चालू ठेवला. शेवटी महाराजांनीच पन्हाळा खाली करून दिला. इतर डावपेचासाठी! इतके प्रयत्न करुन शेवटी अदिलशहाला शिवाजी मिळाला नाही.

एक संकट संपले तरी अजून शाहिस्तेखानाचे संकट होतेच त्याने आतापर्यंत एकच पराक्रम केला, तो म्हणजे तीनचारशे मावळ्यांनी सांभाळलेली चाकणची गढी प्रचंड फौजेनिशी, तोफाबंदुकांच्या माऱ्यांनी घेतली.

महाराज सुटल्यानंतर त्यांनी खानाच्या करतलबखान आणि रायबाधन यांचा उंबरखिंडीत आणि नामदारखानाचा मिऱ्या डोंगराजवळ सपाटून पराभव केला. नेताजीही छुपे छापे घालून खानाचे लचके तोडत होताच, पण अशाने खानाचे संकट टळत नव्हते. त्याकरता त्याच्यावरच धाड घालणे आवश्यक होते. आणि एक दिवशी रात्री (६ एप्रिल १६६३) निवडक सैन्यासह महाराजांनी लालमहालावरच धडक दिली. खासा खानच सापडला पण त्याच्या सुदैवाने तो मेला नाही खिडकीतून पळताना तीन बोटे तुटली. प्राणावर आले ते बोटावर निभावले. त्याचा मुलगा, एक बेगम आणि इतर कित्येकजण मात्र मृत्यू पावले ! ह्या हल्याने खान घावरला. जो तीन वर्षे लालमहालात ठाण मांडून बसला होता तो पुढे तीन दिवस देखील थांबला नाही. औरंगाबादेकडे पळून गेला. स्वराज्यावरचे हेही संकट गेले. पण या बातमीने औरंगजेब खूपच संतापला आणि "या शिवाजीचा कायमचा बंदोबस्त कसा करता येईल" याचा विचार करू लागला.

मोगलांचे लचके तोडण्याचे काम चालूच होते. आता नवी मोहीम हाती घेतली. बहिर्जीने आपले काम चोख बजावले आणि महाराजांनी एक दिवशी साऱ्या सैन्याला बोलावले आणि कूच केले. स्वराज्याच्या बाहेर दीडशे कोस दूर !

मोगलांची सुरत म्हणजे कुबेराचे भांडार. रत्ने, हिरे, सोने यांनी भरगच्च भरलेले ! महाराजांनी त्यावर धाड घातली. इनायतखान हा सुरतेचे रक्षण करीत होता. किल्ल्यात बसून ! सुरत संपूर्ण लुटून झाली. बराच भाग मराठ्यांनी जाळून टाकला. तरी बहाद्दर किल्ल्याच्या बाहेर आलाच नाही. काय शौर्य ! जबाबदारीची केवढी मोठी जाणीव ! ! महाराजांनी तीन दिवस सुरत लुटली. एवढ्यात महाबत खान येतो आहे, अशी बातमी लागताच महाराज निघून गेले. जसे अकस्मात आले तसेच. वळवाच्या पावसाप्रमाणे !

मोगलांचा सरदार जसवंतसिंग कोंढाण्याला वेढा घालून त्यावर डोके आपटीत बसला होता. त्याच्या जवळून, केवळ तीन कोसावरून, ही फौज सुरतेवर गेली, लूट घेऊन परत आली तरी या बहाद्दराला पत्ता नाही. मोगली कारभाराचा एक नमूना!!

महाराज प्रचंड लूट घेऊन गडावर आले. आणि काही दिवसातच हृदयाचा ठाव घेणारी बातमी राजगडावर आली. शहाजी राजे गेले. गड हादरला. दुःखाने काळवंडला. जिजाबाई सती निघाल्या. राजांना किती वाईट वाटले असेल? राजांनी परोपरीने सांगितले पण जिजाबाई एकेनात. शेवटी दुःखावेगाने राजे म्हणाले "आईसाहेब, शपथ आहे तुम्ही सती गेलात तर!" आणि....आईसाहेब राहिल्या. शिवबाने त्यांना रहाणे भाग पाडले. आईवेड्या शिवबाने आपल्या आईला मृत्यूच्या मिठीतून परत आणले. (१६६४)

महाराजांच्या स्वराज्याच्या कारवाईने अदिलशाही खिळखिळी झाली होती. तिचे कंबरडे मोडले होते. तरी झुंजत होती अदिलशहाने खवासखानाला पाठविले. बाजी घोरपड्यांना, महाराजांच्या कट्या दुष्मनाला खानाच्या मदतीला जायला सांगितले. महाराजांना बातमी कळताच त्यांनी मुधोळवर स्वारी केली. महाराजांच्या हातानेच बाजी घोरपडे मेला. आईसाहेबांचे आणखी एक स्वप्न पुरे झाले. आणि खानाचे काय झाले....? नेहमी प्रमाणे दणदणीत पराभव!!

अदिलशहाप्रमाणेच औरंगजेबही वैतागला होता. आता दख्खनवर कोणाला पाठवायचे? का स्वतः जावे? स्वतः..? छे, अन् फजिती झाली तर? शिवाजीशी गाठ होती. पण कोणीतरी पाठवलेच पाहिजे. कोण....?

विचार करूनकरून त्याने चुटकी वाजवली. सापडले एक अमोल रत्न सापडले. खरोखरच रत्न! एक भव्य पोलादी पुरुष! थोर सेनापती. गंभीर, प्रौढ, भारदस्त, शूर, बुद्धिमान आणि तसाच कर्तबगार. या साऱ्या विशेषणांनी शोभत होते मिर्झाराजे जयसिंह! औरंगजेबाने त्यांना शिवाजीची मोहीम सांगितली. बरोबर खूप सरदार दिले आणि शिवाय दिलेरखानाला पाठवला. का? मिर्झाराजे शिवाजीला सामील होऊ नयेत म्हणून! संशयी स्वभावाची निष्पत्ती.

राजे ऐंशी हजार सैन्यासह स्वराज्यावर आले. (१६६५) दिलेर-खानासह त्यांनी एका बुलंद किल्ल्याला वेढा घातला. किल्ले पुरंदर!! एवढंच करून मिर्झा राजे गप्प बसले नाहीत तर त्यांनी वेगवेगळ्या सरदारांच्या हाताखाली सैन्य देऊन, उभे स्वराज्य भरडायला सुरुवात केली. घोड्यांच्या टापाखाली स्वराज्य उध्वस्त होऊ लागले. मिर्झा राजे थोर मुत्सुद्दी होते यात शंकाच नाही. शिवाजी महाराजांना हे जाणवले. हे संकट वेगळे होते. सामना देणे अशक्य होते. पुढच्या राजकारणावर दृष्टी ठेऊन काहीवेळा माघार घ्यावी लागते. महाराजांनी ठरविले. "शरण जायचे. आई जगदंबेची इच्छा".

पुरंदरमात्र खानाच्या माऱ्याने वाकत नव्हता. शरण येत नव्हता. खान हट्टाला पेटला होता. मुरारबाजीने खानाला चांगलेच पाणी दाखविले. स्वराज्याकरता त्याने प्राण दिले त्याचे अचाट शौर्य पाहून खानाने तोंडात बोट घातले. त्याला कळून चुकले 'मराठ्यांची मने आणि त्यांचे किल्ले जिंकणे हे आपण मानतो तेवढे सोपे नाही'.

महाराज बीनशर्त शरण आले झुंजून न मिळालेला पुरंदर, महाराजांनी खाली करून दिला. शेवटी महाराजांनी तह मान्य केला. व्यथित अंत:करणाने, नाईलाजाने. तेवीस किल्ले आणि चार लाख होनाच्या वसुलाचा मुलूख बादशहाला द्यायचा आणि स्वत: जवळ केवळ बारा किल्ले आणि एक लाख होनाच्या वसुलाचा मुलूख ठेवायचा. केवढा मोठा भुर्दंड! कोवळ्या स्वराज्याचा केवढा मोठा टवका उडून गेला!!

महाराज आणि शंभूराजे मोंगलांचे मनसबदार झाले केवढी लाचारी! केवढा अपमान!! बादशहासाठी कामगिरी आली. "गड पन्हाळा घ्यावा" महाराज निघाले. नेताजी पालकरला वेळेवर बोलावले पण तो आला नाही. महाराजांचा पराभव झाला आणि महाराज संतापले. खूप संतापले. नेताजीला सरनौबतपदावरून त्यांनी दूर केले. चटकन्! अन् काय सांगावे, शिवाजीचा उजवा हात-छे, छे प्रती शिवाजीच- स्वराज्याचा सरनौबत मोगलांना मिळाला. उजेड अंधाराला मिळाला. कसे झाले हे? कदाचित् महाराजांच्या मनी

असे तर नसावे की सरनौबतांना विजापूरकरांकडे पाठवावे. तिकडून अदिलशाही सैन्य आणि इकडून आपण, दोघांनी मिळून या मोगली सैन्याला पाणी पाजावे ? मग झालेले भांडण ? कदाचित नाटक असेल. कोणास ठाऊक महाराजांच्या मनी काय होतं ? इतिहास अबोल आहे.

मिर्झाराजांनी महाराजांना बादशहाच्या भेटीला नेण्याचे राजकारण मांडले. हेतू हा की नमलेला शिवाजी बादशहाभेटीने, त्याने दिलेल्या मानाने मोगलशाहीत मुरावा. एक मातब्बर माणूस मोगलशाहीला मिळावा. ते बादशहाला वारंवार पत्र पाठवीत होते. पण उत्तरच येत नव्हते. आणि एके दिवशी ते फर्मान मिर्झाराजांना मिळाले. औरंगजेबाने लिहिले होते " शिवाला आमच्या मुलाखतीला पाठवा."

महाराजांच्या जीवाची जिम्मेदारी मिर्झाराजांनी घेतली त्यांनी रामसिहाला, त्यांच्या मुलाला कळवले " शिवाजीराजे तेथे येत आहेत. त्यांच्या जीवाला जप. रजपूताचा शब्द खोटा करू नकोस " महाराज-आग्र्याला औरंगजेबाच्या भेटीला निघाले. परक्या मुलखात. स्वराज्या पासून, आपल्या माणसांपासून दूर ! शत्रूच्या राजधानीत आणि तो शत्रूही दगाबाज ! स्वराज्याला काय वाटले असेल ? आईसाहेबांना काय वाटले असेल ! आणि महाराजांच्या राणीवंशाला ? या भावना मनोमनी जाणून घ्यायच्या शब्दांत नाही पकडता येणार. साऱ्यांचा निरोप घेऊन महाराज आणि शंभूराजे निघाले.

तिकडे औरंगजेब निर्विकार मनाने माळेचे मणी ओढत पुढचे मनसुबे आखीत होता. त्याचा पन्नासावा वाढदिवस जवळ आला होता. त्याच दिवशी शिवाजीला भेटण्याचे त्याने ठरवले. राजांना दरबारात उपस्थित करण्याचे काम रामसिंगाकडे सोपवले होते महाराज अंतर कापीत होते.

औरंगजेबाचा वाढदिवस दोन दिवसावर आला. सारी तयारी पूर्ण झाली दिवाक-इ.-आम, दिवाण-इ-खास सारे सजले आता फक्त मुख्य कार्यक्रमच राहिला होता. महाराज आग्र्याच्या हद्दीत आले. औरंगजेबाने त्यांच्या स्वागताची काहीच तयारी केली नाही त्यांचे स्वागत केले रामसिहाच्या कारकुनाने ! !

त्यांच्या राहण्याची जागा रामसिंहाच्या वाड्याजवळच करण्यात आली होती.

वाढदिवसाचा दिवस उगवला. रामसिंहाच्यावर महाराजांना दरबारात नेण्याची कामगिरी होती. पण बादशहाने इतरही कामे त्याच्याकडे दिली होती. अर्थात त्यामुळे त्याला झाला उशीर. महाराज निघाले पण दोघांची चुकामूक झाली. त्यामुळे आणखी घोटाळा झाला. दिवाण–इ–आम मधला दरबार संपला. खास मधला दरबार संपला आणि बादशहाने शिवाजीला दिपविण्यासाठी केलेला सारा साजशृंगार वाया गेला. बादशहा खरे म्हणजे शिवाजीची वाट पहात घुशलखान्याच्या दरबारात बसला होता. चेहरामात्र गंभीर, निर्वीकार होता. बाकीचे मानकरी मानाप्रमाणे उभे होते.

रामसिंह महाराजांना घेऊन आला. महाराज नम्रतेने बादशहापुढे गेले. नजराणा ठेवला. निसार ठेवला आणि त्रिवार मुजरा केला. मुजरा केला ? हो राजकारण साधण्यासाठी, नाईलाजाने सह्याद्रिचा हा सिंह बादशहापुढे त्रिवार वाकला. शंभूराजेही रुबाबात आले. त्यांनीही मुजरा केला. बादशहाने राजांना, शंभूराजांना पाचहजारी मनसबदारात उभे केले. महाराज आल्याचे त्याच्या गावीही नव्हते. महाराजांनी अनेक वेळा पराभूत केलेले सरदार त्यांच्या पुढे होते. त्यात एक होते जसवंतसिंह ! कोंडाणा जिंकता येत नाही म्हणून मार खाऊन परत आलेले ! !

दरबार संपला. पान सुपारी दिली. महाराजांनाही! मानकऱ्यांना खिलत दिली. जसवंतसिंहालाही ! महाराजांना यातून वगळले. मग मात्र महाराज या बुद्धिपुरसर चाललेल्या अवहेलनेने, अपमानाने भडकले. संतापले लालबुंद झाले आणि सह्याद्रिच्या शेराने डरकाळी फोडली "रामसिंह ये हमारे सामने कौन खडा है ?" रामसिंह घाबरला. काय करावे काही कळेना. साऱ्यांनाच आश्चर्य वाटले. आजपर्यन्त खालीमान घालून उभे रहाणाऱ्यांना हे अजब वाटले. रामसिंहाने महाराजांची खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! महाराज म्हणाले " माझ्या शूर मराठ्यांनी ज्यांच्या पाठी अनेकवेळा

पाहिल्या त्यांच्यापेक्षा माझा दर्जा कमी ? मी कोण आहे हे बादशहाला माहीत आहे. मला ही जागा देण्यापूर्वी माझ्या दर्जाचा विचार करायला पाहिजे होता" .... बापरे ... काय ही स्पष्टोक्ती ! आजपर्यंत दरबाराने हे दृश्य पाहिले नव्हते आणि बादशहानेही ! सारे सर्दच झाले. महाराज क्षणभरही न थांबता आपल्या निवासस्थानी गेले.



अपमानीत झालेल्यांनी बादशहाचे कान फुंकले, खरे म्हणजे कान फुकायची तशी आवश्यकता नव्हतीच ! ओढणाऱ्या माळेच्या मण्याबरोबरच पुढची योजना ठरत होती. महाराज कैदेत पडले. सिद्दी फुलादखानाचा चौक्या पाहरे बसले. कडक पहारा. शत्रूच्या राजधानीत. भोवताली काळाकुट्ट अंधार माजत होता आणि महाराजांच्या मनातही !

आता या मगरमिठीतून सुटायचे कसे ? विचार करूनही युक्ती सापडत नव्हती. अंधारातून प्रकाशाच्या किरणांचा मार्ग दिसत नव्हता. महाराज रोज विचार करून थकून जात. एके दिवशी विचार करत,

करता एक विचार लख्खकन चमकून गेला. अंधाऱ्या रात्री वीज चमकावी तसा ! महाराजांनी आपल्या जवळची बहुतेक माणसे घरी पाठवून दिली. अगदी निवडक लोक जवळ राहिले.

अन् महाराज आजारी पडले. दिवसेंदिवस तब्येत जास्त बिघडू लागली. वैद्य झाले, हकीम झाले. उतार पडेना. सारे चिंतातूर झाले. फुलादखान मधूनमधून चौकोशी करीत होता. बातमी संपूर्ण शहरात पसरली. काहींना वाईट वाटले. काहीना बरे वाटले. बादशहाला कसे वाटले ते त्यालाच माहीत ! तब्येतीला उतार पडावा म्हणून फकीराना, साधू बैराग्यांना मिठाई वाटण्याचे ठरले. रोज मिठाईचे पेटारे येऊ लागले. जाऊ लागले जाताना पेटारे अडवत, पण त्यात असे मिठाई. फक्त मिठाई ! प्रसाद पहारेकऱ्यांनाही मिळे. तळे राखणार तो पाणी चाखणारच ! नंतर हा रोजचा क्रम झाला. पेटारे तसेच जाऊ लागले न तपासता ! न पाहता !!

काही दिवस गेले. आणि महाराजांची तब्बेत फारच बिघडली सगळ्यांचे चेहरे उतरले. आता महाराज काही तासांचेच सोबती राहिले होते. चिंतातूर नजरा सारीकडे भिरभिरत होत्या. नेहमीप्रमाणे पेटारे आले. महाराज आणि शंभूराजे पटकन उठले. जगदंबेचे नाव घेतले अन् पटकन पेटाऱ्यात बसले. त्यांच्या जागेवर हिरोजी फर्जंद झोपला आणि मदारी मेहतर त्यांचे पाय चेपीत बसला. पेटारे निघाले. सगळ्यांची छातडे धडधडत होती. जिभा कोरड्या पडल्या होत्या. देवदयेने सर्व पेटारे उघडले नाहीत. गेले, पेटारे छावणीतून दूर गेले. गेले ते गेलेच. दूर अंतरावर, महाराजांसाठी घोडी तयार होती. पेटारे पाहिल्यावर त्यांना हायसे वाटले. दिल्लीच्या बादशहाला जिंकले ! मिठाई देऊन महाराज पसार झाले.

औरंगजेबाला खबर कळताच त्याने आकाशपाताळ एक केले. संतापला चिडला. नाहीतरी याहून वेगळे तो काय करणार होता ? सगळ्या ठाण्यांना हुकूम गेला "शिवाजी भाग गया है। पकडो हरामजादे को।" कसून तपास सुरू झाला पण शिवाजी कसा सापडणार ? एक दिवस गेला. दोन...तीन...आठ...पंधरा दिवस गेले,

' शिवाजी सापडत नाही, तपास चालू आहे." हाच निरोप बादशहा रोज ऐकत होता. आणि एके दिवशी बातमी आली " महाराज रायगडावर सुखरूप पोहचले " ( १२ सप्टेंबर १६६६ ) महाराज आल्यावर काही दिवसातच इतर मंडळीही आली. शंभूराजेही आले.

बरेच दिवस स्वराज्य या युद्धाच्या वणव्यात होरपळत होते. स्वराज्याची घडी बसवायला जरा विश्रांती आणि स्वस्थता हवी होती. म्हणून महाराजांनी औरंगजेबाला पत्र लिहिले ' आग्र्याहून पळून आलो ह्याबद्दल मी दिलगिर आहे. मी आपला बंदा सेवक आहे. संभाजीला मी आपल्या सेवेला ठेवत आहेच. वगैरे...." यामुळे बादशहा शांत राहील आणि स्वराज्याची पाच हजार फौज औरंगजेबाच्या खर्चाने पोसली जाईल. " बंद्या सेवकाचे " डोके हे असे विचित्र चालत होते.

दोन तीन वर्षं सुखासमाधानात गेली. शेते पुन्हा धान्याने डुलू लागली. कोठारे भरली. बऱ्याच दिवसांनी घरधनी इतके दिवस घरी राहिल्याने घरे आनंदली. तृप्त झाली. सारे ताजेतवाने झाले आणि महाराजांनी साऱ्यांना पुकारले.

नव्या वर्षाची नवी मोहीम कोंढाण्यापासून सुरू करायची. पण गड बळकट. उदयभान महा जिद्दीचा. कोण घेणार कोंडाणा. तान्हाजी पुढे आला अन् त्याने सांगितले, 'मी घेतो कोंडाणा ' महाराज निर्धास्त झाले. तान्हाजी, सूर्याजी पाचशे मावळ्यांसह रात्री कडा चढून गेले. एकदम झडप घातली. पण हाय....सुभेदार पडले. उदयभानाला मारले अन् तान्हाजीही पडला. सूर्याजीचा भाऊ गेला. त्याचं दुःख काय सांगू ? पण छातीचा कोट करून त्याने मावळ्यांना अडवले. तान्हाजीच्या मृत्यूने संतापलेले मावळे मोगली फौजेला भारी झाले. गड आला. गड आला पण सिंह गेला. महाराजांचा एक बाल मित्र गेला. महाराजांचा प्रत्येक विजय हा असा दुःख मिश्रीतच ! रडता रडता हसायचं ! !

महाराजांनी अनेकांना वेगवेगळी कामे नेमून दिली होती. आतापर्यंत मोगली मुलाखातून वीस लाखाच्यावर लूट मिळाली होती. गडावर रोज विजयाच्या बातम्या थडकत होत्या. वऱ्हाड लुटला. औसा

लुटला. पुरंदर, सिंहगड, लोहगड, माहुली, चाकण, तुंग, तिकोना आणि आणखी कितीतरी किल्ले स्वराज्यात दाखल झाले. मुलूख जिंकला गेला मिर्झा राजांनी मुत्सुद्देगिरीची शर्थ करून मिळवलेल्या साऱ्या गडावरचे हिरवे झेंडे मराठ्यांनी केवळ चार महिन्यात उपटून फेकून दिले काय प्रचंड सामर्थ्य होते. केवढे भयंकर तूफान होते !

महाराजांनी कोकणात धुमाकूळ घातला. नंतर कल्याण भिवंडी घेतली. पुन्हा अहमदनगर लुटले. काही दिवसांनी महाराजांनी पुन्हा सुरत गाठली. यावेळी औरंगजेबाने सुरतेच्या रक्षणासाठी मातीचे तट उभारले होते. डोंगरी किल्ले धडाधड घेणाऱ्या मावळ्यांना या तटाने काय होणार ? ज्यांनी आपल्या छातीचे तट उभारले आहेत त्यांना मातीचे तट कितीवेळ तटवू शकणार ? महाराजांनी पुन्हा सुरत लुटली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी !!

तीन दिवस सुरत लुटून महाराज निघाले आणि शहाजाद्याला ही बातमी समजली. त्याने दाऊदखानाला महाराजांवर पाठवले. महाराजांना बातमी कळली त्यांनी पाचहजार पायदळ लुटीबरोबर दिले. आणि स्वतः दहा हजार मावळ्यानिशी लुटीच्या पिछाडीला राहिले. दिंडोरीजवळ या दोन्ही सैन्याची गाठ पडली. दिवसभर युद्ध चालू होते. अखेर नेहमीप्रमाणेच मराठ्यांच्या तिखट प्रतिकारापुढे मोगली फौज दुबळी पडली आणि शेवटी ? प्रचंड पराभव !! महाराजांना फार मोठा विजय मिळाला. सारी लूट बिनधोक राजगडावर आली.

मोरोपंतांनी खानदेश बऱ्हाणपूर लुटला. महाराजांनी संपत्तीचे "कारंजे" स्वराज्याकडे वळवले अमाप संपत्ती स्वराज्यात दाखल झाली. इकडे औरंगजेबाने दिलेरखानाला आणि बहादूरखानाला मराठ्यांवर जायला सांगितले मोठमोठ्या सरदारांनी साल्हेरला वेढा घातला पण मोरोपंत आणि प्रतापराव गुजराने तुंबळ युद्ध करून महाराजांना जय मिळवून दिला. काही दिवसांनीच अनाजीपंतांनी आणि कोंडाजी फर्जंदाने रात्री केवळ साठ मावळ्यानिशी छापा घालून

पन्हाळा स्वराज्यात दाखल केला. आणखी कितीतरी ठाणी स्वराज्यात आली. धन, संपत्ती आणि प्रदेश यांचा ओघ स्वराज्याकडे सारखा वाहत होता.

तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत राज्य विस्तारले होते. महाराजांनी उदंड राज्य मिळविले होते.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा, क्र. ९८७१ दिनांक १२:१:८६
विषय ऐ.बा. क्र..........

## — अजुनी स्थैर्य ना मनी जनांच्या

महाराजांनी भगीरथप्रयत्नांतून, शून्यातून स्वराज्य निर्माण केले. तीस-चाळीस वर्षापूर्वी कुणी सांगितले असते की, "हिंदवी स्वराज्य निर्माण होणार आहे. पातशाही नष्ट होणार आहे." तर सारेच हसले असते. स्वतंत्र हिंदवी स्वराज्य ? काय खुळचट कल्पना ! चारही बादशहाचा एवढा प्रचंड दरारा असताना ? नवा प्रयत्न एका फुंकरीने उधळला जाईल. आहे हिंमत कोणाची ?


हिंमत होती. मराठी सिंहाची ! सह्याद्रिची !! सह्याद्रिच्या कुशीत वाढणाऱ्या एका सिंहाने ही किमया केवळ तीस वर्षात केली. भारतात साडेतीनशे वर्षे मुरलेल्या पातशाहीचा काही भाग तीस वर्षात उखडून काढला. शत्रूच्या राजधानीत जाऊन त्याच्या हातावर तुरी देऊन .... छे, छे, मिठाई देऊन हा वीर महाराष्ट्रात सुखरूप आला. त्याच्या पराक्रमाने, शौर्याने, मुत्सुद्देगिरीने तमाम शत्रू थक्क झाले. त्याचा किर्ती सुगंध भारतभर दरवळला. त्या सिंहाचे नाव ? नरशार्दुलाचे नाव ? शिवाजी!!

फुलाचा सुवास दरवळला की मधुकरांना आमंत्रण द्यावे लागत नाही. रसिकाला ओळख पटते. गुणी लोकांच्याकडे गुणी लोक आकर्षित होतात. गुणवंताच्या कीर्तीने आपण होऊन येतात. माग काढीत येतात.

तारुण्याने रक्त सळसळत असणारा एक तरुण असाच महाराजांच्याकडे आकर्षिला गेला. वय होते विशीचे. शौर्यही होते तसेच दैदिप्यमान. त्याला कळले दक्षिणेकडे शिवाजी राजा स्वतंत्र राज्य स्थापन करतोय. खूप पराक्रमी आहे. हे ऐकून त्याला स्वतःला पश्चाताप झाला. स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या आपल्या आईवडिलांना ज्या औरंगजेबाने छळले, मारले त्या औरंगजेबाची नोकरी करण्याची शरम वाटू लागली. आणि ह्या सिंहाचा बच्चा महाराजांच्याकडे निघाला. बुंदेल खंडातला एक असामान्य हिरा ! छत्रसाल बुंदेला !! चंपतराय बुंदेल्याचा मुलगा.

कृष्णाकाठाजवळ असणाऱ्या छावणीत महाराज विसावले होते. हा कुमार त्यांची गाठ घ्यायला आला. महाराजांना कळताच त्यांनी त्याचे स्वागत केले. त्याला असनावर बसवले. छत्रसालाने आपली चूक कबूल केली आणि राजांच्याकडे नोकरीची इच्छा व्यक्त केली. महाराज म्हणाले "छत्रसाल, आपण नोकरी करू नका. जा ; असेच बुंदेल खंडात जा. सैन्य जमा करा आणि पातशाही नष्ट करा. काम हाती घ्या. विजयी व्हाल. आम्ही तुमचेच आहोत हे लक्षात ठेवा."

आणि या उपदेशाने छत्रसाल प्रज्वलीत झाला. महाराजांनी



एका वीराला स्वतंत्र राज्य स्थापण्याची स्फूर्ती दिली. विचारवंताच्या भाषणसामर्थ्याने समोरचा माणूसही विचारशील बनतो. शौर्याने शौर्याला स्फूर्ती दिली. एका ज्योतीने दुसरी ज्योत प्रज्ज्वलीत झाली.

महाराजांच्याकडे शूर लोक अशी स्फूर्ती घ्यायला येत होते.

एके दिवशी महाराजांना वर्दी मिळाली " उत्तरेतून कोणी एक कवी भेटायला आले आहेत". महाराज जसे शूर तसेच रसिक होते. त्यांनी कविराजांना आत यायला सांगितले. स्वागत केले. " आई ये कविराज !" असे म्हणून आसनावर बसवले

पातशाहीत वावरणारा हा कवी विरघळला. आदरातिथ्याने भारावून गेला. आजपर्यंत जे कल्पनेला दिसले होते, समजले होते त्याहूनही हे रम्य, उदात्त दिसत होते. सारे न्यारेच होते. शिवाजीची त्याने ऐकलेली कीर्ती अनुभवाने खरी ठरली. तो स्वत:ला भाग्यवान म्हणवू लागला. त्याचे नाव कवी भूषण !! त्याने राजांच्यावर काव्य लिहिले " शिवाराज भूषण "

अशा कवीच्यासारखे आणखीही कवी महाराजांच्या आश्रयाला आले. अनेक कलावंतही आले. इथे आपल्या कलेचे चीज होईल याची त्यांना खात्री पटली.

गुणी कलावंताना महाराजांची ओळख पटली होती.

शूर वीरांना, मुत्सुद्यांना, गुणी कलावंतानाच महाराजांची ओळख पटली होती असे नाही तर, ऋषीतुल्य साधुसंतही महाराजांच्यावर प्रसन्न होते. या आनंदवन भुवनाचे वर्णन करण्यात आणि शिवाजीला अनेक विशेषणांनी मढवून टाकण्यात समर्थ रामदास अग्रेसर होते. त्यांनी महाराजांच्या या पवित्र कार्याची मुक्तकंठाने स्तुती केली होती. त्यांना आशीर्वाद दिला होता. तुकाराम महाराजांनाही हे युगप्रवर्तकत्व पटले होते. तेही प्रसन्न होते. याशिवाय महाराष्ट्रातील इतर साधुसंतही महाराजांची योग्यता समजत होते.

स्वकीयांना याचा साक्षात्कार झाला होता असेच नाही तर परकीयांनासुद्धा झाला होता. त्यांनी आपल्या पूर्वीच्या मतात बदल केला होता.

गोव्याच्या फिरंग्यांनी काही वर्षापूर्वी आपल्या राजाला लिहिले होते " शिवाजी नावाचा बंडखोर फार बलिष्ठ झाला असून अदिलशाही मुलूख तो झपाट्याने घेत आहे. " याचीच री डचांनी ओढली होती. आपल्या डायरेक्टर बोर्डाला कळवले " जुलमामुळे प्रजा बंड करून उठली आहे आणि त्यात शिवाजी नावाच्या बंडखोराकडे तर कित्येक किल्ले आणि शहरे गेली आहेत. " इंग्रजांनीही शिवाजीला एक यशस्वी धंदेवाईक गुंड याच पंक्तीला बसविले होते. तथापि महाराजांचा वाढता दरारा, वाढते शौर्य, सामर्थ्य, मुत्सुद्देगिरी पाहून त्यांनी आपली मते बदलली. शिवाजी उच्च पदवीला पोहचला आहे हे त्यांनी मान्य केले.

शिवाजीशी तह करण्यासाठी इंग्रजांचा वकील उस्टीक गेला होता. त्यावेळी इंग्रजानी १६७२ जून १४ च्या पत्रात म्हटले आहे की, " शिवाजीच्या अलीकडच्या भव्य यशामुळे जगाच्या, खुद्द त्याच्या स्वत:च्याही दृष्टीने शिवाजी उच्च पदवीला चढला आहे. "

सर्वांनाच कळून चुकले की, शिवाजी केवळ गुंड, गुंडगिरी करणाऱ्या टोळीचा नायक नाही, तर विचारवंत, मुत्सुद्दी राजकारण धुरंधर आहे. याची प्रचिती औरंगजेबालाही आली होती. शिवाजीचा बीमोड करणे हे आता इतके साधे, सोपे राहिले नाही हे त्याला कळून चुकले होते. शिवाजीच्या पराक्रमाची कीर्ती भारताबाहेर गेली होती. खुद्द इराणच्या शहाने एकदा औरंगजेबाला विचारले होते "तुम्हाला शिवाजीचा पराभव करता येत नसेल तर मी हिंदुस्थानात येऊ का ?"

तीस वर्षाच्या काळात शिवाजी महारांची योग्यता ही अशी वाढली होती. स्वातंत्र्यांच्या नवकल्पनांचे उगमस्थान आणि स्फूर्तिस्थान, कलावंत, साधुसंत आणि धर्मसंस्कृती यांचे आश्रयस्थान असे त्यांचे स्थान होते.

महाराज रामराज्य आणण्याची खटपट करीत होते. मोगलाईच्या अत्याचारांनी विटलेल्या सामान्यजनांना शिवाजी महाराज तर देवासारखे वाटत होते. स्वराज्याच्या सीमेवरचे शेवटचे घरही सुखात नांदले पाहिजे ही त्यांची मनोधारणा होती. त्याकरता त्यांचा अट्टाहास होता.

आणि तरीही –

आमच्याच लोकांना शिवाजी हा राजा वाटत नव्हता. सामान्य जनता अजूनही बादशहाला भीत होती. याची जाणीव महाराजांना सिंधुदुर्गाच्या बांधणीच्या वेळी झाली. महाराजांनी मालवणाला सिंधुदुर्ग बांधायचे ठरविले. भूमिपूजनाची तयारी केली. ब्राह्मणांना बोलावले पण ते येईनात. कारण उघड होते, शिवाजी पातशहाचा शत्रू ! "आज भूमीपूजनाला गेले आणि उद्या पातशहाला कळले तर ? तर घरादाराचे वाटोळे ठरलेले " ही भीती त्यांच्या मनी वसत होती. स्वराज्याचा हा दुबळेपणा होता. आपल्या पाठीशी सत्तेचे भक्कम पाठबळ आहे हे तिला जाणवत नव्हते. त्याचा प्रत्यय येत नव्हता आत्मविश्वास वाटत नव्हता. आणि म्हणूनच हे स्वराज्य चिरायू आहे हे पटत नव्हते.

बरं, शिवाजीराजे खरे राजे कुठे होते ? त्यांना राज्याभिषेक कुठे झाला होता ? त्यामुळे बऱ्याच लोकांना हे राज्य हे खरे राज्य आहे.

हे पटतच नव्हते कसे पटणार ? स्वराज्य हे अगदी नवीन, या उलट पातशाही अनादी कालापासून चालत आलेली. आपली वतने बादशहाच्या शिक्याची असली तरच खरी असे त्यांना वाटत होते. सामान्य जनांच्या मनात महाराजांच्या शिक्कामोर्तबला ते स्थान निर्माण झालेले नव्हते. त्यामुळेच महाराज चांगले आहेत, स्वराज्य चांगले आहे हे कळत होते पण वळत नव्हते. राज्याची शाश्वती वाटत नव्हती.

आणि याशिवाय बादशहाच्या पदरी असणारे मराठी सरदार शिवाजीला ' राजा ' कसे मानणार ? त्यांच्या दृष्टीने तो गुंडच होता. शिवाजीचा मत्सर करणारेच अधिक होते. शाहीलोकही स्वतंत्र 'राजा' मानायला तयार नव्हते. खुद्द औरंगजेबही राजांचे मोठेपण नाईलाजाने मान्य करीत होता. त्याला हे स्वतंत्र राज्य झाले आहे हे पटत होते; पण तसे मान्य मात्र करत नव्हता.

महाराजांना या गोष्टी सलत होत्या. याचे वाईट वाटत होते. त्यांना मोठेपणा हवा, मानमरातब हवा होता, या करता त्यांचा अट्टाहास नव्हता पण सामान्य जनांना या राज्याची शाश्वती वाटली पाहिजे. सीमेवरील प्रत्येक घर सुखाने नांदले पाहिजे. मुकी जनावरेही निर्धास्त मनाने सीमेवर चरली पाहिजेत. ही त्यांची इच्छा होती. या करता त्यांचा अट्टाहास होता तरीही साऱ्या जनतेला हे सार्वभौम राज्य आहे असे का वाटत नव्हते. हे समजत नव्हते. याचा बोध कुणालाच होत नव्हता. निदान होत नव्हते. राज्याबद्दल प्रत्येक नागरिकाच्या मनात प्रेम, आपुलकी, निष्ठा निर्माण होणे स्वराज्याच्या दृष्टीने आवश्यक होते जनतेच्या मनात मधूनमधून डोकावणारीही अस्थिरता काढून टाकायला पाहिजे होती. काहीतरी चुकत होते. कमी पडत होते. पण नक्की काय हे समजत नव्हते. म्हणूनच सामान्य जनांच्या मनात स्थैर्य नव्हते.

* * *

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. ९८१. दिनांक ७-२-९-८७
ग्रं. वा. क्र. ......

## —ही तर धर्माची आज्ञा

पवित्र गंगा नदीचे पाणी संथ वाहत होते. काशीविश्वेश्वराची महती लाटालाटातून गात होते. गंगेच्या काठी एक प्रकांड पंडीत, ज्ञान-सूर्य आपल्या तेजाने तळपत होता. अध्ययन, अध्यापन, संस्कृत ग्रंथरचना करणे यात गढला होता. दिवसामागून दिवस उलटत होते. पंडितांचे कार्य चालू होते.

एके दिवशी अपूर्व घडले. सारा आसमंत

यवनांच्या घोड्यांच्या टापांखाली रगडला गेला. औरंजेबाच्या सैन्याने काशीविश्वेश्वरावरच धाड घातली. मंदिर भंगले. मूर्ती घणाच्या घावाखाली फुटली आणि पंडितांचे मनही ! पूर्वी अशीच यवनी धाड आली होती. काशीविश्वेश्वर भंगला होता त्यावेळी पंडितांच्या पणजोबांनी नारायणभट्टांनी त्याची पुन्हा प्राणप्रतिष्ठा केली होती. तेव्हापासून भट्ट घराण्याने काशीविश्वेश्वराचे भजन पूजन श्रद्धेने चालवले होते.

आणि आज... ? आज पुन्हा काशीविश्वेश्वरावर गदा आली होती. पंडीत दुःखाने व्याकूळ झाले. वाईट वाटले. देवाची मूर्ती स्थापन करून आता भागणार नव्हते त्या मूर्तीपाठीमागे सामर्थ्य हवे होते. सामर्थ्याची आराधना हवी होती दुबळ्यांची मनोराज्ये पूर्ण होत नसतात हे त्यांना माहीत होते असा विचारवंत, महापंडीत, तेजोभास्कर म्हणजे गागाभट्ट !

भट्टघराणे म्हणजे थोर घराणे. शाखा उपशाखांनी बहरलेले. सारेच विद्वान आणि अभ्यासू. एकाच घराण्यात सर्व लोक विद्वान निघणे कठीण; पण नियमाला अपवाद असतात ! काशीला या घराण्याला अग्रपूजेचा मान होता. त्यात गागाभट्ट तर वेदोनारायण. त्यांचे खरे नाव विश्वेश्वर पण वडील लाडाने ' गागा ' म्हणत आणि तेच नाव पुढे प्रसिद्ध झाले. वेदांचा सखोल अभ्यास, षट्शास्त्र प्रवीण, हुशार, महामीमांसक असे हे गागाभट्ट ! अनेक ग्रंथरचनाही त्यांनी केल्या होत्या. त्यांच्या ज्ञानाला तोड नव्हती त्यांची ही कीर्ती भारतवर्षात पसरली होती आकाशात तेजो सूर्य तळपत होता तर भारतवर्षात हा ज्ञानसूर्य आपल्या तेजाने प्रकाशत होता.

गंगेच्या काठी बसल्या बसल्या दक्षिणेतल्या बातम्या गागाभट्टांच्या कानावर येत असत शिवाजीने स्वराज्य स्थापना केली आहे. दिवसेंदिवस तो सामर्थ्य संपन्न बनत आहे शून्यातून त्याने हे निर्माण केले आहे. हे राज्य न्यायाचे आहे धर्माचे आहे. राजा नीतीमान आहे. मुत्सुद्दी आहे. या साऱ्या वार्ता कळत होत्या दिवसेंदिवस या पुरुषाबद्दल गागाभट्टांचा आदर वाढत होता उत्सुकता वाढत होती. काही दिवसातच आग्राप्रकरण त्यांना समजले. असलेला भाव द्विगुणित झाला. ते मनोमन

या कार्याला आशीर्वाद देत होते. यवनांच्या पार्श्वभूमीवर हे नवल वर्तत होते.

अशा स्थितीत ज्यावेळी औरंगजेबाने विश्वेश्वरावर हल्ला केला, मूर्ती फोडली त्यावेळी गागाभट्ट व्यथित झाले. यवन मातले आहेत. धर्म राज्य राहिले नाही, याला सामर्थ्याने उत्तर दिले पाहिजे याची साक्ष अंतर्यामी पटली. आणि गागाभट्टांना शिवाजी महाराजांची आठवण झाली. या महापुरुषाची गाठ घेण्याची तीव्र इच्छा झाली त्यांनी महाराजांची भेट घ्यायचे ठरविले त्यांची पावले दक्षिणेकडे वळली. ज्ञानसूर्य शौर्याच्या राशीला भेटायला निघाला आपण होऊन !

महाराजांच्या हेरांनी बातमी आणली. " काशीचे वेदोनारायण प्रकांड पंडीत गागाभट्ट आपल्याला भेटायला येत आहेत. " महाराजांना आनंद झाला. हा पंडीत आपण होऊन भेटायला येतो आहे याचे आश्चर्य वाटले. " काय हेतू मनी धरोन येत असावा ? " उत्सुकताही होती. महाराज विद्वानांचे चाहते गडावर विद्वानांचा सत्कार नेहमी व्हायचा. ही राजांची परंपराच होती. हे महर्षीतर काशीहून मुद्दाम येणार होते. त्यांचा योग्य तो सत्कार केलाच पाहिजे. शिवाय काशीला अग्रपूजेचा मान असणारे महापंडीत ! !

गागाभट्ट नाशिकला गोदावरीतीरी आल्याची बातमी महाराजांना कळली आणि त्यांनी आपल्या राजोपाध्यांच्या बरोबर लवाजमा दिला. त्यांना सामोरे जायला सांगितले आणि मानाने पालखीतून रायगडावर घेऊन यायला सांगितले.

लवाजमा गागाभट्टांना आणण्यासाठी नाशिकला गेला. त्यांच्या स्वागतात कोणतीही उणीव राहू नये म्हणून महाराज स्वतः दक्ष होते. जगदीश्वराच्या वाटेवर अनेक नवीन घरांची बांधकामे होत होती एक घर महाराजांच्या नजरेत भरले. त्यांनी ते गागाभट्टांच्यासाठी राखून ठेवले.

'रायगडवाडीनजिक वसवलेल्या नवीन बाजारपेठेलगत एक भव्य शामियाना उभारला होता. अतिशय सुरेख खांबांवर शामियाना उभारला होता. बऱ्हाणपुरी चिटांचे पडदे सोडले होते. मौल्यवान

कापडांच्या कनाती लावल्या होत्या. झालरींनी शामियान्याला अधिकच शोभा आली होती. गाद्या, लोड, तक्के सारी तयारी उत्कृष्ट होती. भेटीच्या आधी केशर, कस्तुरीचे सडे घालायला सांगितले होते. उदबत्त्या लावून वातावरण सुगंधित ठेवायची व्यवस्था झाली होती पाद्यपूजेची साधनसामुग्री तयार होतीच गडावर येणाऱ्या प्रत्येक ज्ञानवंताचे स्वागत होत होते पण हे विशेष होते एका महान पंडिताचे. त्याला साजेसे स्वागत होणार होते.

गागाभट्ट महाडहून निघाले महाराजांनी सारी तयारी केली. शंभूराजांना सांगाती घेतले. मंत्री बरोबर होतेच. राजे गडावरून उतरून गागाभट्टांना सामोरे निघाले. दोन धर्म रक्षकांची, संस्कृती संवर्धकांची ही भेट! दोन सूर्यांची ही भेट!! दोघेही थोर आणि नम्र माणिकांचन योग!!

गागाभट्टांची पालखी आली. महाराज परिवारासह सामोरे गेले. राजांना पाहून गागाभट्ट खाली उतरले. आपाद मस्तक न्याहाळले. ती रसरशीत अंगकाती, तेजस्वी डोळे, रुबाबदार व्यक्तीमत्व पाहून गागाभट्ट आनंदित झाले. हरखून गेले. युगायुगाची आस पूर्ण झाल्या-सारखे वाटले. महाराजांनी लवून नमस्कार केला गागाभट्टांचा हात आशीर्वादासाठी वर गेला. काय आशीर्वाद दिला असेल ? असं मनातलं इतिहास कधी सांगत नाही. 'राजा तुझ्या कार्यात तू शुक्लेन्दूवत् यशस्वी हो' असाच आशीर्वाद दिला असावा. राजांच्या पाठोपाठ साऱ्यांनी नमस्कार केले.

सारे शामियान्याकडे निघाले. गागाभट्टांच्यावर सगळ्यांच्या नजरा खिळल्या होत्या. नक्षीकाम केलेला पित्रळा रुमाल त्यांनी डोक्याला बांधला होता. रेशमीकाठी धोतर आणि कशीदा काढलेली तांबडी लाल शाल अंगावर घेतलेली. कपाळ भव्य होते त्यावर शिवगंध रेखले होते. डोळे बोलके होते. ज्ञानाचे तेज आणि अधिकाराची निशाणी त्यात प्रतीत होत होती. गळ्यात रुद्राक्षांची माळ होती. भस्माचे पट्टे गळ्यावर आणि हातावर ओढलेले होते. पायातील खडावा चट्...चट् वाजत होत्या. त्यांचे ते दिपवणारे व्यक्तीमत्व पाहून सारे सुखावले

होते. एका थोर महात्म्याचे पाय आपल्या स्वराज्याला लागल्याबद्दल महाराजही स्वतःला कृतार्थ मानीत होते.

महाराजांनी शामियान्यात गागाभट्टांचे योग्य स्वागत केले. त्यांना गडावर नेले राणीपरिवाराने व महाराजांनी पाद्यपूजा केली. साऱ्यांनी आशीर्वाद घेतले महाराजांनी त्यांना सांगितले "आपण गडावर वास्तव्य करावे." त्यांनीही ते मान्य केले. त्यांच्या निवासस्थानी गागाभट्टांची सुरेख व्यवस्था झाली.

गागाभट्टांची तेजस्वी नजर गडावरून भिरभिरत होती. प्रधानांच्या बोलण्यावरून बऱ्याच गोष्टी कानावर येत होत्या. शिवाजी-राजांबद्दल मनात ज्या कल्पना घेऊन ते येथवर आले त्या सत्य ठरल्या होत्या किंबहुना वस्तुस्थिती त्याहीपेक्षा चांगली होती हा पुरुष न्याराच आहे याची त्यांना खात्री पटली. तृप्त प्रजा, समृद्ध खजिना, गुणवंताचा, ज्ञानवंताचा लोकसंग्रह, प्रजेचे अतूट प्रेम हे त्यांच्या नजरेस येत होते. राजांची धीरगंभीर प्रवृत्ती, शालीनता, नम्रता, निगर्वी स्वभाव, उद्योग-प्रियता, सावधानता हे त्यांना दिसत होते. राजांनी मिळवलेले गडकोट, सजवलेले अरमार आणि हे सारे मिळवत असताना प्रत्ययाला आलेले शौर्य, मुत्सुद्दीपणा ह्यांचे दर्शन झाल्याने गागाभट्ट संतुष्ट झाले "भूलोकी राजा असावा तर असा" असे धन्योद्गार त्यांच्या मुखातून निघाले असतील.

चारपातशाह्या आपल्या वैभवाच्या कळसावर असताना राजांनी हे सारे वैभव निर्माण केल्याने, याचे मूल्य अधिक होते. प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत, प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहोत राजांनी यश, कीर्ती मिळविली होती. किनारा गाठला होता. आणि हे सारे कशा-करता तर स्व-राज्यासाठी ! धर्मासाठी. मानवता धर्मासाठी ! तीर्थक्षेत्र आणि देश गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी ! प्रजेला सुखी, समाधानी, संतुष्ट राखण्यासाठी. जनहिताय हा सारा खटाटोप. सारे अवलोकन करून गागाभट्टांचे नेत्र तृप्तीच्या आसवांनी काठोकाठ भरले. राजांसाठी वारंवार आशीर्वाद त्यांच्या मुखातून उमटू लागले त्यांना धन्य वाटले. कृतार्थ वाटले. या महापुरुषाचे दर्शन झाले हा अमृतयोग वाटला.

– आणि त्यांना हेही जाणवले या असामान्य माणसाला छत्र नाही. सिंहासन नाही. पूर्वीच्या राजांनी जे केलें तेच या पुरुषोत्तमाने केले रामराज्याचा प्रयत्न याने केला. कृष्णाचे कार्य याने अंगिकारले. याला सिंहासन हवे. छत्र, चामरे हवीत ती काळाची गरज त्यांनी ओळखली. राज्याभिषेकाशिवाय, सिंहासनाशिवाय कार्याला मान्यता नाही, प्रतिष्ठा नाही हे त्यांच्या लक्षात आले. या महान कार्याला प्रतिष्ठा मिळवून द्यायची, या थोर महात्म्याला सिंहासनाधिष्ठित करायचे, सिंहासन देऊन राज्याला पूर्णत्व द्यायचे, त्या युगप्रवर्तक कार्याचे मोल जगाला समजावून द्यायचे ! प्रजेच्या मान्यतेसाठी सार्व-भौमत्वाच्या साक्षात्कारासाठी आणि राज्याच्या शाश्वतीसाठी हा राज्यारोहण समारंभ करायचाच हे त्यांनी मनोमनी ठरविले.

गागाभट्टांनी महाराजांना सांगितले " राजे, आपल्याशी काही बोलायचे आहे."

" आचार्य, त्याला अनुमतीची काय गरज ? आपण आज्ञा करावी."

" राजा, एक महत्त्वाचा विचार मांडायचा आहे. राजा, सदरेवर मंत्र्यासह, वर्तमान आपण उदैक प्रत:काळी तिथे यावे. आईसाहेब देखील हव्यात. मग मी माझे मनोगत सांगेन."

" जशी आपली आज्ञा."

हे वेदोनारायण एवढे महत्त्वाचे काय सांगणार, राजांना समजेचना. कुतुहल दाटले होते. महाराजांच्या सारखेच आईसाहेबांचे मनही उतावळे झाले होते. गागाभट्ट काय सांगणार आहेत हे ऐकायला साऱ्यांचे कान उत्सुक झाले होते, तर डोळे उद्याचा उगवता सूर्यनारायण पहायला ! !

राजसदरेवर सर्व प्रधान उपस्थित होते. सदर खास सजवलेली होती. मधोमध एक उच्चासन ठेवले होते. त्यांच्या जवळच्या खास बैठकीवर शिवाजीराजे होते. जवळच आईसाहेब होत्या. बाळराजे जवळच बसले होते. साऱ्यांचे डोळे आचार्यांच्या रस्त्याकडे लागले होते. एवढ्यात आचार्य आले. राजीयांनी वंदन केले. साऱ्यांनी उत्थापन

दिले. ते बसल्यानंतर राजे, आईसाहेब बसल्या. प्रधान मंडळ आदबीने उभे होते राजे म्हणाले,

" आचार्य, आपल्या इच्छेप्रमाणे सारे उपस्थित आहेत. आपला मनोदय सांगावा."

" राजा, आम्ही इथे आलो, आपल्या पाहुणचाराने तृप्त झालोत."

" आपल्या बोलानं आम्ही धन्य झालोत "

" राजा, तुझं राज्य पाहिलं आम्ही प्रसन्न झालोत. सारी प्रजा तुझ्यावर संतुष्ट आहे. धनागार भरलं आहे शिवबा, तुम्ही आता सत्ताधीश अहात. तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत तुमच्या राज्याचा विस्तार झाला आहे. सगळीकडे कसं उत्तम आहे. पण यात एक गोष्ट फार फार खटकली "

" आचार्य, आपल्याला काय खटकलं ? "

" तुमचं कार्य थोर असताना, पूर्वीच्या राजांच्या पंक्तीत तुम्ही बसत असताना, राजे तुम्हाला सिंहासन नाही. छत्रचामरं नाहीत. हे योग्य नव्हे. "

हे ऐकताच साऱ्यांच्या मुखकलिका उमलल्या. आईसाहेब सर्वांगाचे कान करून ऐकू लागल्या. आचार्य सांगत होते,

' राजा, तुझ्या राज्यावर शिक्का मोर्तब व्हायला पाहिजे. तुम्ही अभिषिक्त व्हायला पाहिजे. सामान्य जनतेला ' आपल्याला कोणी त्राता आहे ' ह अश्वासन मिळालं पाहिजे. हिंदूधर्माला अभय मिळायला हवं. धर्मासाठी, प्रजेसाठी तरी तुम्ही सिंहासनावर बसलं पाहिजे. तख्ताचा अंगिकार केला पाहिजे. "

केवढे गोड शब्द ! आज कित्येक वर्षात कुणाच्याही तोंडून निघाले नाहीत. सारे हरखले. आईसाहेब तर आनंदून गेल्या. " शिवबा तख्तावर बसणार ? माझा मुलगा छत्रपती होणार ? धन्य माझा कुसवा " असेच त्या माऊलीला वाटले असणार. मंत्रीमंडळही आनंदले. मोरोपंत म्हणाले –

" आचार्य, आमचंच मनोगत आपल्याला मुखातून बाहेर पडलं. महाराजांना खरंच राज्याभिषेक हवा. "


बाकीच्या मंत्र्यांनीही संमती दिली. आचार्य म्हणाले, " राजे, एवढीच याचना आहे. आपण तख्ती बसावे "

" आचार्य, याला काय याचना म्हणतात ? आपण साक्षात वेदोनारायण ! काशीविश्वेश्वर आपल्या मुखातून बोलला. ही याचना नाही आचार्य, आम्ही ही धर्माज्ञा मानतो. आजपर्यंत आम्ही धर्माज्ञा मोडली नाही. या आज्ञेचंही आम्ही पालन करू."

" धन्य राजा ! याचीच अपेक्षा आम्ही करीत होतो."

" आचार्य, चरणी एक विनंती आहे."

" बोला-राजे...."



" हा सारा सोहळा आपल्याच हाताने व्हावा. सोहळ्यात आपले आशीर्वाद आम्हाला लाभावेत."

" हे करताना आम्हाला आनंद वाटेल. राजा हे आमचं कर्तव्यच आहे "

आचार्य निवासस्थानी गेले सदर रिकामी झाली. पण सारा गड हर्षाने भरून गेला जो तो नाचत, आनंदाने सांगत होता. एक दुसऱ्याला सांगत होता, ' आता लवकरच महाराज राज्यावर बसणार !

राज्याभिषेक सोहळा होणार !' रायगडाच्या कणाकणाला बातमी समजली. रायगड अभिमानाने फुलून गेला. आकाशात उंच मान करून महाराष्ट्राला, साधुसंताना साऱ्या साऱ्यांना सांगू लागला. "एक नवं अवतरणार. युग शिवाजी महाराज सिंहासनाधीश्वर छत्रपती होणार ! तख्तावर बसणार ! !"

* * *

— राजधानी रायगड

राज्याभिषेकाच्या बातमीने गडावर गोड गडबड उडवून दिली. खरं म्हणजे अजून चार पाच महिने आवकाश होता; पण तयारी मात्र जोरात सुरू झाली. आपल्याकडेच पहा ना, लग्न मुंज असली की कामे करायला महिना दोन महिने पुरत नाहीत. मग हा तर राज्याभिषेक! एक का काम····? गडावर जवळ जवळ पन्नास-साठ हजार माणसांचा राबता

होणार. त्यांची उतरण्याची व्यवस्था, भोजनाची व्यवस्था व्हायला पाहिजे. राजसदर, सिंहान, वस्त्रंप्रावरणे, दागदागिने, होम हवनांचे सामानसुमान, एक का दोन गोष्टी····किती यादी द्यायची ? एवढे सारे करायचे म्हणजे चार पाच महिन्यांचा काळ हवाच! कुठे उणीव नको रहायला. बरं आपापली काम सांभाळून हे काम करायचे. मोरोपंतांच्या पासून ते सामान्य माणसापर्यंत सारेच कामात गर्क होते. आईसाहेबही! त्यांच्या व्रताचे तर हे उद्यापन! त्यांच्या अंगात नवा उत्साह संचारला होता. सारे राबत होते. आनंदाने उत्साहाने

या सगळ्या समारंभाला राजांनी गड निवडला रायगड ! राजधानी रायगड! गड उंच कैलासासारखा; पवित्रही तसाच. गडावर रक्त कधी सांडले नव्हते. कडे ताशीव, पावसाळ्यातसुद्धा कड्यावर गवत उगवणार नाही. असे प्रचंड कडे. अति दुर्घट! राजधानी अजिक्य असायला हवी दुर्ग रायगड तसाच होता

गडाचा पसारा मोठा ठिकठिकाणी पाण्याची टाकी तुडुंब भरलेली होती. गंगासागर, कोळींब तलाव, कुशावर्त, बाराटाकी हे जलसंच गडाला शोभा आणत होते. हत्तींच्या करता खास हत्तीतलाव होता यापूर्वीच अठरा कारखाने तयार झाले होते. बारा महाल तयार होते. तरीही आणखी कितीतरी बांधकामे तयार होणे आवश्यक होते.

महाराजांना गडाच्या भव्यतेची, कल्पना होती. पण एकदा मंत्र्यांचा अभिप्राय पहावा या हेतूने त्यांनी मोरोपंतांना विचारले,

"पंत, रायगडाची निवड राजधानीसाठी केलीत पण राबता खूप होईल. सारं कसं जमायचं ?"

"महाराज, सारी व्यवस्था केली आहे. शामियाने, नवी घरे बांधली जात आहेत. गडावर पन्नास हजारांची सोय होईल शिवाय पाचाडलाही काही व्यवस्था होईल. आपण मुळीच काळजी करू नये."

"पंत, तुम्ही असताना कशाला काळजी करायची ?"

"महाराज, राजसभा, जगदीश्वराचं मंदिर या वास्तू बांधायला खास हिराजी इंदुलकरांना सांगितले आहे."

"छान ! चांगली निवड केलीत."

पंताच्या आज्ञेने बांधकामे साकारू लागली गड सजू लागला. राजसभेचे बांधकाम सुरू झाले. जगदीश्वराचे मंदिर आकारले, गंगासागराच्या दक्षिणकाठावर सुंदर सुंदर मनोरे उभे राहिले. राजसभेच्या प्रवेशद्वारी भव्य नगारखाना उभा राहिला. त्याचे प्रवेशद्वार एवढे मोठे होते की, जरी पटक्याचा हत्ती झेंड्यासह आत जावा. नगारखान्याच्या दोन्ही अंगांना सिंह आपल्या पंजांनी हत्तींना मारत असल्याची शिल्पे खोदण्यात आली. राजधानी सजत होती. दिवसेंदिवस तिचा नखरा उमलत होता

गागाभट्टही कामात गर्क होते. राज्याभिषेकविधीचा त्यांनी छोटासा ग्रंथच तयार केला होता. अनेक विधी, होम हवने व्हायची होती. त्यांच्या सामानाची यादी तयार झाली होती. महाराजांचे राजोपाध्ये बाळंभट आर्वीकर हे जातीनिशी गागाभट्टांना मदत करीत होते. राज्याभिषेकाच्या सामानाची व्यवस्था होत होती. राज्याभिषेकाचा मुहुर्त त्यांनी अत्यंत चिकित्सेनं ठरविला होता जेष्ठ शु, १३, शनिवार, सूर्योदयापूर्वी तीन घटका !

राणीवशातली गडबड तर काही विचारू नका. आधीच बायकांना नटण्यामुरडण्याची हौस अन् त्यातनं हा केवढा मोठा सोहळा. राजाच्या घरचा ! मग काय विचारता, वस्त्रप्रावरण, शेले, शालू, दागदागिने यांच्या याद्या भराभर तयार झाल्या. खास सोनार दागदागिने तयार करीत होते. दिवसाकाठी नवी नवी वस्त्रे पसंतीसाठी येत होती.

राजांच्या सुवर्णसिंहासनाचे काम रामजीप्रभू चित्रे पहात होते एकूण बत्तीस मण सोने या सिंहासनासाठी लागणार होते. हिरेमाणके कितीतरी लागणार होती. त्यात आणखीही एक छोटे सिंहासन, छत्र-चामरं तयार होत होती. कोणाकरता...? हे काय विचारता ? प्रतापगडावर महाराजांची स्फूर्तिदात्री देवता मायभवानी होती. आधी तिला सिंहासन, छत्र चामरं आणि मग स्वत:ला. महाराजांची ही निष्ठा होती. श्रद्धा होती

एकंदरीत सगळीकडे उत्साह होता. कामाची गडबड होती. आनंदाचे पाट वहात होते. आणि या सगळ्या धामधुमीत महाराज

मात्र राजकारणात गढले होते. राज्याभिषेकाचे निमित्त काढून शत्रूने त्याचा फायदा घेऊ नये यासाठी धडपडत होते.

याच वेळी दैवमात्र विचित्र सोंगट्या पुढे मागे करीत होते. प्रतापराव गुजरांनी, स्वराज्याच्या सरनौबतांनी काही दिवसापूर्वी बहलोलला धर्मवाट दिली होती. तोच आता उलटला होता. स्वराज्यावर चालून येत होता. महाराजांना हे सहन झाले नाही. त्यांनी प्रतापरावांना लिहिले " खान स्वराज्यावर चालून येतो हे कसे ? त्याला साफ बुडवून फत्ते करणे नाहीतर तोंड न दावणे " महाराज संतापले होते. त्यांचे हे शब्द प्रतापरावांना झोंबले. गडावर राज्यारोहणाची गडबड. खानाला बुडवून गडावर गेले पाहिजे. सरनौबताशिवाय राज्याभिषेक कसा होणार ? पण रावाने विचार केला नाही. महाराजांचे शब्द वर्मी लागले. खान नेसरीच्या खिंडीत असताना प्रतापरावाने केवळ सहा जणांच्यासह खानावर हल्ला केला. क्षणभरच वीज कडाडली आणि गर्दीत नाहीशी झाली.

गडावर बातमी आली आणि महाराजांना दुःख असह्य झाले. प्रतापराव आता खरंच तोंड दाखवणार नव्हते. राज्याभिषेकाच्यासाठी सुवर्ण कलशातून दुधाचा वर्षाव आता प्रतापराव करणार नव्हते. एक बाजू खचली इलाज नव्हता. महाराजांच्या पुढे नियतीने हे ताट वाढून ठेवले होते.

हे दुःख कमी होत होते, पुन्हा गड पूर्ववत काम करू लागला होता. तोच आणखी एक कडा कोसळला. बुरूज ढासळला. महाराजांच्या जीवालाच चटका लावून गेला. न सांगता न बोलता महाराजांच्या राणी साहेब काशीबाईसाहेब या निवर्तल्या. महाराजांची सोबत करताना, हात धरून चालताना, हात सोडून निघून गेल्या. भरला संसार टाकून गेल्या. खेळ अर्धवट सोडन गेल्या. प्रेमळ आणि अबोल काशीबाईंना शेवटच्या समयी भेटता आले नाही. महाराजांच्या जीवाला फार फार लागून राहिले. हा ही कडू जहर पेला महाराजांनी पचवला अश्रूंची नदी पापण्यात गोठवली रायगड दुःखी झाला. राज्याभिषेकापूर्वी केवळ तीन महिने हे असे घडायचे होते. नियती माणसाला निर्भेळसुख भोगून

देत नाही की काय कुणास ठाऊक ?

महाराज दुःख विसरले पुन्हा कामाला लागले. मनातले दुःख बाहेर दाखवता येत नाही. आतल्या आत कोणाला न दिसता एकट्याने ते सोसायचे असते. मोठेपणाला मिळालेला हा शाप आहे.

सैन्याची छावणी चिपळूणला पडली होती आपल्या सैनिकांची एकदा पाहणी करावी म्हणून ते चिपळूणला गेले. अभिषेकापूर्वी केवळ दोन महिने ! सारी पाहणी झाली. याचवेळी महाराजांनी अदिलशहाचा एक अवघड किल्ला जिंकला. किल्ले केळंजा !

सरनौबत कोणाला करावे हा प्रश्न महाराजांच्या पुढे होताच. प्रतापरावांची जागा भरून काढणे आवश्यक होते. शिवाय सैन्याला सरनौबत नाही, हे सैन्याच्या दृष्टीनेही चांगले नव्हते आणि शत्रूच्या दृष्टीनेही ! महाराज विचार करीत होते. आणि एक वीर सापडला. धाडसी, धोरणी आणि स्वराज्याशी इमान राखणारा. हंसाजी मोहिते. महाराजांनी हंसाजींना सरनौबत केले. त्यांना हंबीरराव असा किताब दिला. मराठी दौलतीचे नवे सरनौबत हंबीरराव मोहिते !

चिपळूणला महिनाभर राहून, सैन्याची पाहणी करून, स्वराज्याचा सरनौबत नेमून महाराज रायगडावर परतले. ९ मे १६७४ चा सुमार. राज्याभिषेकाला एक महिना उरला होता. अभिषेकाची तयारी अखंड उत्साहाने चालली होती.

* * *

## — भासे ही तर कुबेर नगरी

जगदीश्वराचे दर्शन घेऊन महाराज सदरेकडे निघाले. बरोबर मोरोपंत होते. अनाजी होते. गडावरचा थाट डोळे दिपवत होता. सगळ्या गडावर शामियाने, राहुट्या, मंडप यांच्या रंगीबेरंगी रंगांनी रायगड शोभून दिसत होता. बांधकामे सारी पूर्ण झाली होती. महाराज बाजारपेठेतून येत होते. बाजारपेठेतला राजमार्ग रुंद होता. दुकानाची जोती सरळ सुतात होती.

पुरुष पुरुष उंच होती. दुतर्फा घाटदार जोती अन् वर भव्य दुकाने होती. काळ्या फत्तरांनी जडविलेल्या नक्षीदार कमानी तिचं ऐश्वर्य व्यक्त करीत होत्या. सारे कसे भारदस्त होते ही सारी रचना पाहून महाराज संतोष पावले. पंतांना ते म्हणाले,

"पंत, ही स्वप्ननगरीच उभी केलीत की ! आम्ही स्वराज्याची स्वप्ने पहात होतो, पण राज्यवैभवाचे हे स्वरूप आमच्या डोळ्यां-समोर कधीच उभे राहिले नव्हते. त्यावेळेला जे स्वप्नात तरळले त्यापेक्षा हे स्वरूप केवढे विराट आहे ?"

"महाराज, सारी आपली कृपा !"

"चुकलात पंत ! हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा ! ! आई भवानीची कृपा. तिने सारे घडवून आणले. आम्ही निमित्तमात्र !"

महाराज बोलत बोलत सदरेत आले. आसनावर बसले. मोरोपंत अनाजी आदबीने उभे होते.

"पंत, इतर व्यवस्था झाली ?"

"जी, होय महाराज ! भारत वर्षातील सप्तगंगाची उदके. समुद्र आणि पवित्र नद्यांची उदके आली आहेत. लोकांच्या उतरण्याचा प्रबंध झाला आहे. बाकी सारी सिद्धता आहे. कामांची खातेवार वाटणीही केली आहे. राजकीय पाहुण्यांची खास व्यवस्था अनाजी-पंतांच्याकडे दिली आहे. सर्व तयारी पूर्ण आहे. प्रत्येकजण कामात दक्ष आहेत."

"पंत, आम्ही तुमच्या कामावर निहायत खुश असतो. तुमच्या-सारखे अनाजींच्यासारखे सहाय्यकर्ते मिळाले म्हणून हा स्वराज्याचा प्रपंच आम्ही करू शकतो."

"महाराज, चरणी एक विनंती आहे. समय असेल तर..."

"बोला पंत... तुम्ही सांगितल्यावर वेळ काढलाच पाहिजे."

"महाराज, रामजी प्रभूंनी सिंहासन, कलश, दागदागिने तयार केलेत आईसाहेबांनी पाहिलेत, पण आपण नजरेखालून घालावेत."

"आईसाहेबांनीच सांगितलंय, राजे आल्यावर त्यांना एकदा सारं दाखवा."

" जशी आईसाहेबांची इच्छा."

महाराज पंतांच्या बरोबर लक्ष्मीगृहात गेले. खरेच लक्ष्मीगृह ! नावाप्रमाणे !! अत्यंत सुबक कलाकुसरींनी युक्त असणारा रौप्य तराजू जाता जाताच मन वेधून घेत होता. सुवर्ण कलश, रौप्य कलश ओळीने मांडून ठेवले होते चांदीचे चौरंग, सुवर्णपात्रे पळ्यापंचपात्री कितीतरी बारीकसारीक वस्तू अत्यंत बारकाईने सुबक केल्या होत्या. राणीवशाचे दागदागिने रत्नमाळा डोळ्यांना प्रसन्न करीत होत्या. डोळे दिपत होते. वस्तूंवरून दृष्टी काढूच नये असे वाटत होते. हत्तीवरची सोन्याची अंबारीही सुरेख होती. भवानीदेवीसाठी केलेली छत्रचामरे इतर देवांसाठी केलेले खास दागिनेही महाराजांनी पाहिले. नंतर पंतांनी सिंहासन दाखविले. बत्तीस मण सोन्याचे, अष्टकोनी सिंहासन. आठ नक्षीयुक्त खांबांवर सिंहाचे मुखवटे तयार केलेले. सशास्त्र तयार केलेले, रत्नांनी मढवलेले. काय वर्णन करणार त्याचे. महाराज प्रसन्न होते.

" पंत ! सुरेख... सुरेख काम झालंय ".

" महाराज, खूप खूप रत्न खर्ची पडली तेव्हा कुठं हे वैभवानं तळपायाला लागलंय ".

" खरं आहे पंत ! कित्येक रत्ने गमवायला लागली तेव्हाच हे सिंहासन उभे राहिले."

" महाराज, समजलो नाही..."

" पंत एवढे राजकारणी, हुषार तुम्ही ! पंत या स्वराज्याचे सिंहासन सजवताना फार अमूल्य रत्नांना गमवावे लागले. त्यांच्यामुळे हे सिंहासन उभे राहिले. आज साऱ्यांची आठवण होते आहे ".

" खरे आहे. त्यांच्याच तपश्चर्येचे हे फळ आहे. "

महाराज विषय बदलून म्हणाले,

" पंत, ही कलाकुसर ज्यांनी केली त्यांना बोलवा. आम्हाला त्यांच्या कामगिरीचे कौतुक करायलाच पाहिजे ."

थोड्याच वेळात रामजीप्रभू चित्रे समोर आले. महाराज म्हणाले,

"रामजी, आम्ही तुमच्या कौशल्यावर खुश आहोत" महाराजांनी हातातले सोन्याचे कड काढले. त्याची पाठ थोपटली. त्याला कडे बहाल केले आणि महालाकडे निघाले. महालात जाताच आईसाहेब समोर आल्या.

"राजे, लक्ष्मीगृहातून आलात वाटतं. पसंत आहेना सारे ?"

"आईसाहेब ! आपल्या पसंतीप्रमाणे आपण करून घतल्यावर आम्हाला पसंत पडणार नाही असे कसे होईल ?"

"राजे, तुम्ही बोलायला काय ऐकणार अहात ? बरे, असेच वस्त्रागारात येणार का ? वस्त्रप्रावरणेंही पाहून होतील."

"जरूर...! पंत, आजचा दिवस म्हणजे कुबेर नगरीत हिंडल्या-सारखे वाटते आहे अगदी. चला.'

वस्त्रागारात राणीवशाची गडबड उडून गेली होती. पंत बाहेरच थांबले होते. महाराज आलेले पाहताच सारेच गप्प झाले. समोर विविध रंगांची वस्त्रे पाहून कोणाचेही डोळे तृप्त झाले असते. जरींची भारीप्रावरणे झळकत होती. इंद्रधनुचे रंग साकारले होते. आईसाहेब महाराजांना त्यांचा पोशाख दाखवू लागल्या. पाच सहा जिरेटोप ठेवलेले होते. त्यांना मोत्यांचे घोस खोवलेले होते. असंख्य तुमानी, अंगरखे, रेशमी धोतरे, शेले. सारे पाहून महाराज थक्क झाले. आश्चर्य-चकीत झाले. ते म्हणालेच "आईसाहेब, हे सारे आमच्यासाठी ?"

"राजे, राज्याभिषेक ना तुमचा ? अनेक धर्मकृत्य व्हायची. अनेकदा अंघोळी करायला लागायच्या. एवढी वस्त्रे लागणारच !"

"जशी आपली इच्छा, बरं आम्ही आता चलू का ?"

"जा आता, हे पाहिलंस बरं वाटलं बघ. जा, आता काय काम असतील ती निवांत करत बसा."

तोच पंत आत आले.

"महाराज, गागाभट्ट सदरेवर आले आहेत, असा निरोप आला आहे.

"चला, आपण तिकडेच जाऊ."

सारे सदरेवर आले. महाराजांनी गागाभट्टांना अभिवादन केले.

आशीर्वाद देऊन ते आसनावर बसले. महाराज शेजारी खालच्या बाजूला बसले.

"आचार्य, आपल्या मनाप्रमाणे साऱ्या गोष्टी मिळतात ना ?"

"राजे, सांगायचा अवकाश की कामे कशी वेगाने होतात. सर्वजण कामात फारच तत्पर आहेत. राजे, आपल्या अभिषेकविधीसाठी आम्ही छोटासा ग्रंथच तयार केला आहे. धार्मिक विधीच्या सामानाची सारी पूर्तता झाली आहे. आपल्या राजोपाध्यांनी स्वत:च्या देखरेखी-खाली सर्व सिद्धता केली आहे."

"ठीक आहे. पंत यांना आणखीही काही हवे असले तर द्यायची व्यवस्था करा..."

"जशी आज्ञा"

"राजा, आज मी मुद्दाम सांगायला आलो की धार्मिक विधींना आता लवकरच सुरुवात करायची आहे, तेव्हा आधी साऱ्या देवतांना निमंत्रणे पाठवावीत. समारंभाची अक्षद द्यावी. मग सुरुवात."

"जशी आपली आज्ञा ! आचार्य,. आम्ही प्रतापगडी भवानी-मातेचे दर्शन घेऊन येतो. तोपर्यंत साऱ्या देवदेवतांना आक्षद दिली जाईल आणि मग प्रारंभ करू या."

कसबा गणपती, जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, पंढरीचा विठोबा, घृष्णेश्वर.... आणि महाराष्ट्रातल्या साऱ्या देव-देवतांना अक्षद गेली. मराठ्यांचा राजा सिंहासनावर बसतो आहे, मायबापांनो कार्य निर्विघ्न पार पडू द्या. राजाला आशीर्वाद द्यायला साऱ्यांनो या. हे शुभ कार्य पूर्ण करा. अक्षद निघाली आणि महाराजांनी स्वत: प्रतापगडी जाण्याकरता प्रस्थान ठेवले.

❋ ❋ ❋

# उदयोस्तु जगदंबे !

महाराज प्रतापगडला जायची तयारी करीत होते. होळी चौकात खाशा स्वारांचे पथक तयार होते. महाराजांनी इशारत केली की निघायचे ! शंभूराजे तयार झाले. महाराजांनी पोशाख केला. ते आईसाहेबांच्या महाली आले. नमस्कार केला.

" आईसाहेब, आम्ही प्रतापगडी जाऊन येतो."

" जा शंभूराजांना नीट सांभाळून न्या."

" आईसाहेब, राजे आता लहान का आहेत !"

" ते तुम्हाला नाही कळायचं. जा आता. तब्बेत बरी असती तर मीही आले असते. भवानीमातेला आमचा दंडवत सांगा आणि म्हणावं आई जगदंबे कार्य निर्विघ्न पार पडू दे."

महाराज निघाले. सांगाती शंभूराजे होते. स्वारांचे एक पथक पुढे होते. महाराजांच्या मागेही खास स्वार होते. महाड मागे पडले.

चैत्रात हिरवीगार झालेली वनराई सुखद होती. दाट छायेमुळे सूर्य किरणांचा ताप वाटत नव्हता. मंद मंद वारा वहात होता कोकिळा मधून मधून सुस्वरात गात होत्या. पक्षांचा किलबिलाटही प्रसन्न वाटत होता. निसर्ग प्रसन्न होता अन् महाराजांचे मनही !

सारी मंडळी पायथ्याशी पोहचली. गर्द झाडीत प्रतापगड दडला होता. तो ही दर्शनाकरता उत्सुक झाला होता. महाराज गड चढत होते. चढता चढता गेल्या पंधरा वर्षातल्या आठवणी उचंबळून येत होत्या. अफजलखानाचा प्रसंग आठवला ' त्या समयास भवानी मातेने तारले म्हणूनच आजचा हा दिवस दिसला. जिथे भेट झाली होती, त्या जागी महाराज क्षणभर थबकले. " इथेच सारे महाभारत घडले होते. इथेच खानाने आमच्यावर वार काढण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. आमच्या सैन्याने याच खोऱ्यात खानाच्या सैन्याची धुळधाण उडविली. प्रचंड लूट मिळाली. एका रात्रीत आम्हीं बलशाली झालो. आमची मनं खंबीर झाली. आत्मविश्वास ओसंडून जाऊ लागला. त्या-वेळचे तान्हाजी, बाजी, नेताजी छे, आज कोणी नाहीत." महाराजांचे मन आपल्या सोबत्यांच्या आठवणीने गहिवरले. राजे पुढे चालू लागले. गडावर पोहोचले.

महाराजांनी रात्री विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी स्नान केले. उपाध्याय तयार होते. महाराज देवीच्या पूजेला बसले. यथासांग पूजा केली. सुवर्णाची छत्रं चामरे अर्पण केली. भक्तिभावाने दंडवत घातला. राजे म्हणाले असतील " आई तुझ्या कृपेनं आज हा अमृताचा दिवस दिसतोय. स्वराज्यावर अनेक संकटं आली पण तू अनंत हातांनी मदत केलीस. तुझ्याविना हे घडलं नसतं. झालं नसतं.

हे राज्य व्हावं ही तुझी इच्छा. माते त्या राज्यावर शिक्का मोर्तब करायचं आहे. समारंभास ये. अनंत हातानं आशीर्वाद दे. आई ! हे राज्य धर्मराज्य होऊ दे. रामराज्य होऊ दे. सारे सुखी होऊ देत. हे राज्य चिरायू होऊ दे. हाच आशीर्वाद दे. आई···· हाच आशीर्वाद दे "

पूजा संपली महाराजांनी गडावर दानधर्म खूप केला. जेवणाच्या पंक्ती उठल्या. रात्रीच्या वेळी गोंधळाचा कार्यक्रम आयोजित केला होता. देवीच्या देवळात माणसांची गर्दी उडाली होती. महाराज खाशा आसनावर बसले होते. शंभूराजेही जवळच होते भुते आले. दिवटी नाचवली. नंतर गोंधळयांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. साऱ्या देवांना आवातन झाले. गोंधळ संपला, तेव्हा पहाटेचा कोंबडा आरवला होता.

तोही दिवस महाराजांनी गडावर काढला. या धामधुमीत देखील राजे राजकारण विसरले नाहीत. गडकऱ्यांसह, काही महत्त्वाच्या लोकांच्या गा.ीभेटी झाल्या. साऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन झाल्या. समारंभ चालू असताना गडकोटाचे प्राणपणानं रक्षण करण्याचे हुकूम महाराजांनी दिले.

महाराजांनी भवानीला परत एकदा वंदन केले. अशीर्वाद मागितला आणि राजांनी गड उतरायला सुरुवात केली. गडावरचा आनंद ओसंडून वाहत होता. आता आमचे राजे महाराजाधीराज होणार. देवी भवानीचा अशीर्वाद होता. गडाचा अशीर्वाद होता. सारेच उत्सुक होते राज्याभिषेकाच्या मुहुर्तासाठी ! त्या मंगल घटिकेकडे साऱ्या स्वराज्याचे लक्ष लागले होते. आणि महाराज राज्याभिषेकाच्यासाठी रायगडाकडे जात होते.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दिनांक १२.१.८६
ना. क्र. १८०१. क्र. ........
विषय बा. वा.

## — आज शिवाजी राजा झाला

महाराज गडावर आले. गड पाहुण्या-राऊळयांनी फुलून गेला होता. राजकीय पाहुणे, सरदार, मानकरी झाडून सारे आले होते. महाराष्ट्राच्या महाराजांना मुजरा करायला ! हिंदुपतपातशाहीच्या राजाला अभिवादन करायला. सारी सिद्धता होती. मुहुर्त वाट पहात होता. आता त्यालाही धीर धरवत नव्हता. दिवस भर्‌कन संपत होते.

ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीचा मंगल दिवस उगवला. भल्या पहाटे रायगडाला तोरण लागले. गडावर हळदीकुंकू, केशरकस्तुरीचे सडे पडले. सगळ्यांची गडबड उडून गेली. उगवत्या सूर्याने सोनेरी किरणातून सोन्यासारख्या आनंदाची उधळण केली. सदरचौकात भव्य शामियाना उभारला होता आज महाराजांची मुंज होती. सुवर्णाच्या गंगाळात मुहुर्ताची घटिका हेलकावू लागली. महाराज मुंडावळ्या बांधून तयार होते. गागाभट्ट आणि बाळंभट्ट पौरोहित्य करीत होते आणि शुभमुहूर्ताची घटिका बुडाली. वेदमंत्रांच्या घोषात अग्नीच्या साक्षीने महाराजांनी यज्ञोपवीत धारण केले.

धर्माप्रमाणे आता महाराजांची लग्ने होणार होती. .परत. परत.... ? हो ब्रह्मचर्याश्रमानंतर गृहस्थाश्रम! पण महाराजांची लग्ने तर आधीच झालेली होती. आणि मुलेही होती. सहा मुली आणि दोन मुले. आता....आता काय करायचं ? काही नाही, ज्या राण्यांशी महाराजांची लग्ने झालेली होती त्यांच्याशीच परत लग्नं लावायची अगदी साध्या पद्धतीने, थाट माट काही करायचा नाही हं ! मग दुसऱ्या दिवशी ज्येष्ठ शुद्ध पंचमीला महाराजांचे सोयराबाईंशी विधीपूर्वक लग्न लागले आणि नंतर मग सकवारबाईसाहेब, पुतळाबाईसाहेब व इतर राण्यांशी महाराजांची लग्ने लागली. आपल्या आईवडिलांच्या लग्नाला मुलेही हजर होती.

रायगडावर जिकडे तिकडे आनंदाची कारंजी थुईथुई नाचत होती. वातावरण सुगंधी, सुप्रसन्न असे होते. मंगल वाद्यांचे गजर होत होते वैभवाने नटलेला रायगड या आनंदाचे आकंठ प्राशन करीत होता. डोळ्यात सारे साठवून ठेवत होता. कलावंत, विद्वान याना आपले गुण दाखवायला, वेदांत चर्चा करायला संधी मिळाली होती राज्यवैभवाचे सुख सगळ्यांनाच सुखवीत होते.

रोज धार्मिकविधी सुरू होते. महाराज याकाळात व्रतस्थ होते. दूध फलाहार यावरच ते असत. एकेका दिवशी एक एक विधी पूर्ण होत होते. गागाभट्ट जातीने सारे विधी पूर्ण करीत होते. ऋत्विजवर्गाने पुण्याहवाचन करून, यज्ञास प्रारंभ करून विनायक शांती करण्यात

आली नक्षत्रशांती, गृहशांती, ऐंद्रियशांती, पौरंदरीशांती हे विधी पूर्ण करण्यात आले.

ज्येष्ठ शुद्ध एकादशी पासून महत्त्वपूर्ण तुलादान विधीस आरंभ होणार होता. चांदीचे मोठे तराजू ठेवले होते त्यांत खाली असलेल्या पारड्यात महाराज बसले. दुसऱ्या पारड्यातून सोन्याचे होन घातले जात होते ब्राह्मणांचा मंत्रघोष चालू होता. सतरा हजार होन पारड्यात बसले. अन् महाराजांची तुळा झाली. महाराजांचे वजन १६९ पौंड भरले. सर्व सोने महाराजांनी ब्राह्मणांना दान दिले. याच प्रमाणे सोने, तांबे, रुपे, फळे, मसाले, केशर, कापूस इत्यादी अनेक वस्तुंनी त्यांची तुळा करण्यात आली. साऱ्या वस्तूंचे दान करण्यात आले. केवढा मंगल दिन ! केवढा भव्य सोहळा ! ! असा सोहळा झाला नाही. पाहिला नाही.

साऱ्या वस्तूंना आपल्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. अहो, मराठ्यांच्या स्वतंत्र राजाची तुळा करण्याचे भाग्य लाभले ना ? आणखी काय हवे ? सोन्यापेक्षा झगमगणारे त्याचे तेज, रुपापेक्षा धवल यश, कीर्ती, केशराहून दिव्य त्याग आणि फळांच्या माधुर्याहून श्रेष्ठ राजांच्या स्नेहाची माधुरी ! ! मग सगळ्या पदार्थांना का बरे धन्य वाटणार नाही ? जीवनात आणखी काय मिळवायचे असते ?

आता ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी उजाडणार होती. या रात्रीच्या गर्भातच उद्याचा राज्याभिषक होणार होता. याच पहाटेसाठी महाराष्ट्र आतुर झाला होता. अतिथी, मंत्री, सरदार गडावर जमले होते देवदेवता जागत होत्या. देवतांची विमाने आकाशात थांबली होती. पुण्यात्मे डोकावून पहात होते. ज्यांनी स्वराज्यासाठी बलिदान केले तेही याच पहाटेची वाट पहात होते आईसाहेबही याच क्षणासाठी खोळंबल्या होत्या. याच याच क्षणाची सारे.... सारे वाट पहात होते.

भली पहाट झाली. सारे उठले. निसर्गही जागा झाला. छे, छे तो झोपलाच नव्हता. सह्याद्रिच्या जिवलगाकडे कार्य ! झोप कशी येणार ? रात्रभर लुकलुकणाऱ्या दीपज्योती लाऊन ठेवल्या होत्या. चंद्रमाही बराच वेळ त्यांना सोबत करीत होता. वाऱ्याचा आनंदही

अगदी उड्या मारीत होता. आपल्या आनंदाच्या भरात वृक्ष वेलींना किती त्रास होतोय याच्याकडे त्याचे लक्षच नव्हते. आपल्याच आनंदात मग्न होता. नाही म्हणायला सूर्याला लवकर उठायला परवानगी दिली नाही म्हणून तो मात्र रागवला. चिडलाही ! माझ्यापेक्षा तेजस्वी राजाचा अभिषेक आणि मी मात्र सुवर्णाचा अभिषेक करायला नाही याची त्याला टोचणी लागली.

गडावर मशाली फरफरत होत्या. सह्याद्रिच्या एका उंच गडावर केशरी प्रकाश उजळत होता. राजपरिवार, मंत्री अष्टप्रधान, आप्त सर्वजण मंगलस्नान करून आले. राजप्रासाद सुगंधाने मोहरून गेला होता. आनंदाने भरून गेला होता. गागाभट्ट आले सोन्याचे चौरंग मांडून ठेवले होते. अभिषेकासाठी तीर्थे आतुरली होती. आकाशात मेघमालाही आनंदाने गहिवरून आल्या होत्या. त्याही अभिषेकासाठी आतुर होत्या पण तीर्थोदकांनीच त्यांना सांगितले, "तुम्ही वरूनच हा सोहळा पहा. इतक्यात खाली येऊ नका. राज्याच्या समारंभावर पाणी पडेल ना ! अन् आम्ही आहोतच की तुमचं प्रतिनिधीत्व करायला." मग मेघमालांनीही ठरवलं की "खरंच आपण आकाशातूनच सारं न्याहाळू. राजावर छत्र धरू."

गागाभट्टांनी महाराजांना चौरंगाकडे जाण्यास सांगितले. राजे, महाराणी आणि युवराज सोन्याच्या चौरंगावर बसले. अष्टप्रधान हाती दूधा-तूपाचे सुवर्ण रौप्य कलश घेऊन उभे होते. धनगंभीर मंत्रोच्चाराला सुरुवात झाली. पंचामृताच्या, शुद्धोदकाच्या, तीर्थोदकांच्या धारा महाराजांच्या अंगावरून घरंगळू लागल्या.

सप्तगंगांची धार बरसू लागली. गंगा, सिंधु, सरस्वती यांची नावे ऐकून केवढी धन्यता वाटली असेल साऱ्यांना. आणि त्या उदकांनाही ! युगानुयुगे याच समारंभासाठी त्या उत्सुक होत्या पण या जुलमी पातशाहीमुळे कुणी राजा होऊच शकत नव्हता. आज त्यांच्या मनोकामना तृप्त झाल्या होत्या. तरी त्या मात्र पारतंत्र्यातच होत्या, कानावरून घरंगळताना त्यांनी राजांच्या कानात सांगितले असेल "शिवबा, अभिषेकासाठी आम्ही इतक्या लांबून आलोत, आता या

समारंभानंतर आम्हाला मुक्त कर ". समुद्रस्नान, उष्णोदकाचे स्नान सर्व प्रकारच्या अभिषेकाचा समारंभ संपला सुवासिनींनी महाराजांना औक्षण केले. मंगलवाद्ये वाजू लागली.

महाराजांनी तुपाने भरलेल्या काशाच्या पात्रात आपले मुखावलोकन केले. शुभ्रवस्त्रे परिधान केली. अलंकार घातले आता समारंभाचा उत्तरार्ध राज्यारोहण समारंभ होता. मुहूर्त साधण्यासाठी तिकडे जाण्याची साऱ्यांनाच घाई होती.

महाराज येण्यापूर्वीच राज्यसभा माणसांनी फुलून गेली होती. पूर्वेला अतिविशाल प्रवेशद्वार. अलंकारांनी सजवलेले दोन शुभलक्षणी हत्ती दारात झुलत होते. नगारखान्यात नगारा झडत होता. प्रवेशद्वारापासून अनेक भालदार हाती भाले घेऊन आदबीने उभे होते. आतला प्राकार विविध पडद्यांनी, कनातींनी आणि पुष्पमालांनी सजवला होता प्रवेशद्वाराच्या समोर अगदी सरळ रेषेत एक लांब रुंद चौथरा होता त्याच्यावर आणखी एक चौथरा होता. त्यावर मंडपी आणि त्यात दैदिप्यमान सुवर्ण सिंहासन होते सिंहासनाच्या मागे रौप्य तराजू, सुवर्णमत्स्य काही भाल्यांना लावलेली अश्वपुच्छे ही व अशी अनेक राजचिन्हे झळकत होती. डाव्या उजव्या बाजूला मोकळी जागा सोडलेली होती. डावी बाजू राजस्त्रियांसाठी आणि उजवी बाजू प्रधानमंडळ, आप्तांसाठी ! प्रवेशद्वार ते सिंहासन हे अंतर खूपच मोठे होते, पण नेहमीच्या आवाजात बोललेले भाषण प्रवेशद्वारापर्यंत ऐकू यावे अशी योजना करण्यात आली होती. साऱ्यांचे डोळे लागले होते महाराजांच्या आगमनाकडे.

महाराज सिंहासनरोहणाकरता निघाले. ढालतलवार, धनुष्यबाण या आयुधांच्यासह निघाले कुलदेवतेला नमस्कार केला. कुलदेवतांनी संतुष्ट होऊन आशीर्वाद दिला. राजे, महाराणी आणि युवराज गागाभट्ट बाळभट्ट आणि अन्य वेदोनारायणांच्या पुढे नम्र झाले. त्यांनीही तोंड भरून आशीर्वाद दिला महाराज आईसाहेबांच्याकडे आले आणि अनन्यभावाने नमस्कार केला. मूक मनाने सांगितले " आई तुझ्या हुंकारातून, तुझ्या पायधुळीत हे सिंहासन संभवलं त्यावर आरूढ

होण्याकरता जातो आहे. आशीर्वाद दे ! " आईनं काय आशीर्वाद दिला ? नवीन काय देणार ? आईसाहेब आजपर्यंत राजांना आशीर्वाद देत आल्याच होत्या. सिंहासन हे त्याचंच प्रतीक होते. शिवबाने आईचे पांग फेडले. त्यांचे व्रत पूर्ण केले. आज त्याचे उद्यापन होते. त्यांना धन्यता वाटली. तृप्तता वाटली. समाधान वाटले. कृतार्थता वाटली. त्यांनी थरथरता हात शिवबाच्या, सोयराबाईंच्या आणि शंभूबाळाच्या डोक्यावर ठेवला आणि साश्रू नयनांनी भरलेल्या आवाजात आशीर्वाद दिला " दिगंत कीर्तीचे व्हा. यशस्वी व्हा. आयुष्मान व्हा. "



महाराजांनी राजसभेत प्रवेश केला. केशरी रंगांचा जिरेटोप. त्यावर हिन्कळणारा मोत्यांचा घोस, कपाळी लावलेलं शिवगंध, अंगाखांद्यावर रुळणारे दैदिप्यमान अलंकार, भारदस्त वाटणारी दाढी, शस्त्रसंपन्न रूबाबदार व्यक्तीमत्वावर साऱ्यांच्या नजरा खिळल्या. गागाभट्टांनी मंत्रोच्चाराला सुरुवात केली. इतर ऋत्विजांनी आवाजाला साथ दिली. वाद्यांचा गजर होत होता.

गागाभट्टांनी मंत्रोच्चारातून महाराजांना सांगितले " महाराज

सिंहासनारुढ व्हावे." महाराज मखमली पायघड्यांवरून पुढे गेले. सिंहासनाला वंदन केले. 'या राज्यलक्ष्मीला पदस्पर्श कसा करू'? ही शंका त्यांच्या मनात उत्पन्न झाली. मंत्रोच्चार चालूच होते. सारे त्या क्षणाची वाट पहात होते. जयजयकार करायला शब्द आणि टाळी वाजवायला हात थांबले होते.

महाराज सिंहासनावर बसणार तोच त्यांच्या मनात येऊन गेले; "या सिंहासनावर पूर्वी प्रभू रामचंद्र बसले होते, धर्मराज, जनक, शिबी यांच्यासारखे गुणवान, चारित्र्यसंपन्न, प्रजारंजनी तत्पर, त्यागी, विरागी राजे बसले होते. त्यांच्या गुणांचा अल्पांश जरी अंगी असेल तरी सिंहासनावर बसायला हरकत नाही. मी सिंहासनावर बसू का?" महाराज अडखळले. त्यांनी पौरजनांकडे पाहिले आचार्यांच्याकडे पाहिले. गागाभट्टांनी पुन्हा सांगितले "महाराज सिंहासनावर आरुढ व्हावे." साऱ्या लोकांच्या डोळ्यातही राजांना तेच भाव तरळताना दिसले. आणि मग राजे पदस्पर्श न करता सिंहासनावर आरुढ झाले. गागाभट्टांनी त्यांच्या मस्तकावर छत्र धरले. आणि टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. तोफा, बंदुकांनी दाही दिशा दणाणून सोडल्या. आकाशात विजांनी चमचमाट केला. वाद्यांच्या गजर उसळला. महाराजांच्यावर अक्षता सुगंधी फुले यांचा वर्षाव झाला. सारे वातावरण धुंद झाले. महाराजांना सोळा सुवासिनींनी, कुमारिकांनी औक्षण केले, आणि मग गागाभट्टांनी उच्च स्वरात घोषणा केली "आज शिवाजीराजे छत्रपती झाले" त्यांनी मोठ्या स्वरात गर्जना केली, "क्षत्रीय कुलावतंस महाराज सिंहासनाधीश्वर राजा शिवछत्रपती की जय!" आणि मग सगळ्या प्रजेने महाराजांचा जयजयकार केला. गडावरच्या जयजयकाराचा प्रतिध्वनी सह्याद्रिच्या दऱ्याखोऱ्यात कितीतरी वेळ दुमदुमत राहिला होता.

मोरोपंतांनी नंतर महाराजांना सुवर्णाभिषेक केला. महाराजांनी साऱ्या पौरजनांना सांगितले "आज एक भोसल्यांचा वंशज सिंहासनावर बसला आहे असा सामान्य अर्थ कोणी घेऊ नका. हे सिंहासन न्यायाकरता आहे. धर्माला, महाराष्ट्र धर्माला संरक्षण देण्यासाठी आज हे सिंहासन

स्थापन झाले आहे. यापुढे सतींच्या शीलाला धोका नाही, याची ग्वाही देण्याकरता, शत्रूंना इशारा देण्यासाठी हे सिंहासन स्थापन झाले आहे. ” या उदात्त भाषणाने सारेच भारावले सामान्य जनांना, स्त्रियांना, धर्माला, न्यायाला दिलासा मिळाला आणि शत्रूंना गंभीर इशारा ! !

या नंतर मानकऱ्यांनी महाराजांना नजराणे दिले. या प्रसंगी मुंबईहून इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झिडेन हा नारायण शेणवी याच्यासह आला होता साहेबाने साडेसोळाशे रुपयांचा नजराणा महाराजांसाठी आणला होता बऱ्याच वेळानंतर नजराण्याचा कार्यक्रम संपला. आता महाराज देवदर्शनाला जाणार होते

देवदर्शनाच्या मिरवणुकीची तयारी आधीच करून ठेवली होती. एक खास हत्ती सजविला होता. सोन्याची अंबारी होती. हत्ती, घोडदळ पायदळ सारे जय्यत तयार होते वाजंत्रीचे ताफे होते. सारी राजसभा मिरवणूकीत सामील झाली. महाराज सोन्याच्या अंबारीत बसले. माहुत म्हणून सरनौबत हाती सुवर्णाचा अंकुश घेऊन बसले होते. मागे हौद्यात मोरोपंत मोर्चेल घेऊन निघाले. रस्ते, माडयांच्या खिडक्या, घरांची अंगणे माणसांनी फुलून गेली होती. मिरवणुक गजगतीने पुढे सरकत होती. देवदर्शन करून महाराज मिरवणुकीने राजसदरेत आले. नंतर महाल दरवाजात येताच त्यांच्यावर निंबलोण उतरवून टाकण्यात आले. त्यांनी कुलदेवतेला नमस्कार केला. आईसाहेबांना नमस्कार केला

दुपारच्या भोजनानंतर महाराजांनी आपल्या सरदारांना निरोपाचे विडे दिले. वस्त्र प्रावरणे दिली. आईसाहेबांनाही वस्त्रे दिली. रायगडावर राज्याभिषेकानंतरचे विधी चालूच होते.

या सोहळयाच्या स्मरणार्थ राजांनी राज्याभिषेक शक सुरू केला. अष्ट प्रधानांची नावे संस्कृत ठेवली. पंडीत रघुनाथ पंतास ‘ राज्यव्यवहार कोश ’ तयार करण्याची आज्ञा केली. गत संस्कृतीची प्रतिष्ठापना या निमित्ताने होणार होती. स्वत्वाची, स्वसंस्कृतीची स्वधर्माची जाणीव व्हावी व त्यांना तेजस्वी करण्यासाठी, साऱ्यांनी एका छत्राखाली सुसंबद्ध, सुसंघटित उभे रहावे यासाठीतर राज्याभिषेक केला होता. त्यासाठी हे केले.

रायगडावरचा सोहळा संपला होता. महाराजांनी साऱ्यांची यथायोग्य संभावना केली विपुल दानधर्म केला. गुणवंत, कलावंत यांच्या पाठी थोपटल्या. सगळ्यांना बिदागी दिली ब्राह्मणांनाही संतुष्ट केले. गागाभट्टांनातर एक लाख रुपये दक्षिणा दिली बाळाजी अवजींना खरं म्हणजे अष्ट प्रधानात घ्यायचे होते. पण त्यांनी वंशपरंपरेने चिटणीशी मागितली ती त्यांना दिली. मदारी मेहतरलाही राजे विसरले नाहीत. त्यांनी त्याला विचारलं 'तुला काय देऊ ?' तो ही खरंच फार मोठ्या मनाचा. काय मागावे त्याने–? "मला आपल्या सिंहासनावर चादर घालण्याचे काम द्या." धन्य महाराज आणि धन्य मदारी !

सगळे संतुष्ट झाले. राजाने सगळ्यांच्या मनाप्रमाने केले. सगळेच आनंदले. गहिवले. माणसे आणि त्याच बरोबर वृक्षवेली, मेघ, वरुण सारेच! सगळे पाहून भारावून गेले. आनंद मनात मावेना. आजवर थांबून राहिलेल्या मेघपक्तींनी उडचा घेत रायगड गाठला. गडावर आणि साऱ्या सृष्टीवरच आनंदाश्रूंचा अभिषेक होऊ लागला. गड जलधाराखाली निथळू लागला. जणू मनामनात दाटलेला आनंदच प्रवाही बनला होता आणि इकडे आईसाहेबांच्या महालात आईसाहेब राजांना म्हणाल्या "राजे आता गडावरचा गारठा सोसवणार नाही. मला पाचाडला पोहचवा"

"आईसाहेब, इतकी घाई काय आहे. अजून काही दिवस····'

"शिवबा, आता डोळ्याचं, हृदयाचं समाधान झालं. तृप्त झाले मी. आता मला काही नको. आज माझ्या व्रताचे उद्यापन झाले. ही हवाही सोसवत नाही आता परवानगी द्या."

महाराजांनी जड अंत:करणाने सांगितले "जशी आज्ञा."

BVBK-0401891

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र 9८e9.. दिनांक 929:९६
विषय